**प्रकरण २**

**विजयनगर आणि बहामनी राज्यांचा उदय**

**विजयानगर साम्राज्य:**

दक्षिण भारतातील मध्ययुगीन काळातील एक प्रसिद्ध साम्राज्य. इ. स. १३३६ मध्ये कर्नाटकातील विद्यमान बेल्लारी जिल्ह्यात होस्पेट तालुक्यातील हंपी (विजयामगर) येथे तुंगभद्रा नदीच्या दक्षिणेस संगमाचे पुत्र पहिला हरिहर (कार. १३३६–५६), पहिला बुक्क (कार. १३५६–७७), मुद्दण, मारप्पा व कंपण या पाच बंधूंनी या राज्याची स्थापना केली. या बंधूंना विद्यारण्य म्हणजे माधवाचार्य (सु. १२९६–१३८६) स्वामींनी प्रेरणा दिली, अशी वदंता आहे. या साम्राज्याच्या विस्तार दक्षिणोत्तर बेळगावपासून कन्याकुमारीपर्यंत आणि पूर्व-पश्‍चिम आंध्रपासून गोव्यापर्यंत झाला होता. तथापि विजयानगरचे आधिपत्य मानणाऱ्या राजांच्या प्रदेशांचा विचार केल्यास या साम्राज्याची सत्ता उत्तरेस नर्मदा नदीपर्यंत आणि पूर्वेस कटकपर्यंत (ओरिसा राज्य) भिडल्याची दिसते. सुमारे सव्वादोनशे वर्षे विजयानगरच्या सम्राटांनी अधिसत्ता टिकून होती. त्या काळात त्यांनी दक्षिणेत हिंदू संस्कृतीचे संवर्धन-प्रसार-प्रचार कार्य केले आणि दक्षिणेतील मस्लिम शाह्यांच्या राज्यविस्तारास पायबंद घातला. विजयनगर हंपी, पंपाक्षेत्र, होस्पेट इ. वेगवेगळ्या नावांनीही विजयानगरचा उल्लेख केल्याचे दिसून येते. इ. स. १३७३ च्या सुमारास विद्यानगरची (विजयानगर) सेना दक्षिण समुद्रापर्यंत पोहोचली. जवळजवळ दक्षिण हिंदुस्थानातील संपूर्ण प्रदेशावर या सेनेने दिग्विजय मिळविला. त्याप्रीत्यर्थ पहिल्या बुक्क राजाने ‘विद्यानगर’ या आपल्या नगरीचे नाव बदलून ‘विजयानगर’ असे ठेवले. तथापि स्थानिक लोक हंपी असाच याचा उल्लेख करतात.

**ऐतिहासिक साधने:**

विजयानगरविषयी ऐतिहासिक साधनसामग्री विपुल प्रमाणात मिळते. तीत विविध प्रकारची नाणी (सोने, चांदी, तांबे), पुरातत्वीय अवशेष, विपुल कोरीव लेख तसेच ताम्रपट असून संगम, साळुव आणि तुळव वंशातील राजांची दानपत्रे आणि अज्ञापत्रे, परकीय प्रवाशांचे वृत्तांत वंशावळी व विशेष कार्याचीही विश्वसनीय माहिती मिळते. एक विश्लासार्ह साधन म्हणून या शिला लेखांना विशेष महत्त्व आहे. हे लेखसंग्रह (कॉपर्स ऑफ इन्स्क्रिप्शन) ॲन्युअल रिपोर्ट्स ऑफ एपिग्राफिया, आर्किऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडियाचे वार्षिक अहवाल, एपिग्राफिया कर्निटिका (खंड ३-१२), म्हैसूर इन्स्क्रिप्शन्स (खंड १ ला), म्हैसूर आर्किऑलॉजिकल रिपोर्ट्स, नेल्लोर डिस्ट्रिक्ट इन्स्क्रिप्शन्स (खंड १–३), पुदुकोट्टई स्टेट इम्स्किप्शन्स. साउथ इंडियन इन्स्क्रिप्शन्स (खंड ४–६) इत्यादींतून प्रसिद्ध झाले आहेत. यांशिवाय फिरिश्ता (१५५० ? – १६२३?), निजामुद्दिन व सय्यद अली तबातबा या फार्सी इतिहासकारांच्या अनुक्रमे गुलशन-इ-इन्नावहिनी, तबकास-इ-अकबरी आणि बुर्हान-इ—मआसिर या ग्रंथातून तत्संबंधीची माहिती मिळते. विजयानगर साम्राज्याला निकोले दी, काँ ती, फीगॅरॅदू, बार्बोसा, अब्दअल्‌-रझाक (१४१३–८२), पायीश, नूनीश इ. परकीय प्रवाशांनी आपल्या प्रवासवृत्तांतून तसेच पत्रे, दिनदर्शिका व अन्य वृत्तांत यांतून तत्कालीन राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक परिस्थितीसंबंधी माहिती दिलेली आहे, यांशिवाय आदिलशाही, निजामशाही, कुत्बशाही या शाह्यांतील तवारिखांतून विजयानगरसंबंधी काही महत्त्वाचे उल्लेख व तपशील उपलब्ध होतात.

**विजयानगर साम्राज्य-विस्तार (सु. १४८५–१६०५)**

तत्कालीन तेलुगू व संस्कृत साहित्यांतून विजयानगराच्या सांस्कृतीक प्रगतीची कल्पना येते. यांतील, विशेषतः सायणाचार्य (१३०२-८७) व माधवाचार्य यांच्या ग्रंथांतून, येथील राजांच्या शासनपद्धतीविषयी माहिती मिळते. कंपणाच्या पत्नीने मधुराविजयम्‌ नावाचे काव्य लिहिले. कृष्णदेवराय (सु. १४८९–१५२९) याने आयुक्तमाल्यदा नावाचे तेलुगू भाषेत प्रबंध-काव्य लिहिले (१५११). वेंकट सेनापती अनंत यांच्या काकुस्थ-विजयम्‌ या ग्रंथातून ऐतिहासिक सामाग्री मिळते. विजयानगराच्या दरबारात पोर्तुगीजांचा राजदूत असे आणि पोर्तुगीजांशी त्यांचे राजनैतिक संबधही होते. त्यामुळे पोर्तुगीज अहवालातून विजयानगरमधील काही घटनांचे तपशील मिळतात.

विजयानगरच्या राजांनी अनेक राजप्रासाद, किल्ले, मंदिरे आणि अन्य वास्तू बांधल्या. त्यापैकी काहींच्या अवशेषांवरून त्यांची वैशिष्ट्यपूर्ण कलात्मक दृष्टी आणि वास्तुशिल्पशैली दृग्गोचर होते.

**राजकीय स्थिती:** तेराव्या शतकाच्या उत्तरार्धात बहुतेक उत्तर हिंदुस्थानी दिल्लीच्या सुलतानांच्या अधिसत्तेखाली होता. देवगिरीचे यादव, द्वारसमुद्रचे होयसळ, वरंगळचे काकतीय आणि मदुराईचे पांड्य यांच्यामध्ये दक्षिण हिंदुस्थानची राजसत्ता विभागलेली होती. त्यांत आपसात नेहमीच संघर्ष व लढाया होत अल्लाउद्दीन खल्जी (कार. १२९६-१३१६) आणि त्याचा सेनापती मलिक काफूर यांच्या फौजांनी देवगिरी (१३०७), वरंगळ (१३१०), द्वारसमुद्र व मदुराई (१३११) अशा चारही हिंदू राजसत्तांचा पराभव केला. परिणामतः दक्षिण हिंदुस्थानातील हिंदू राजाची सत्ता संपुष्टात आली. यानंतर १३२० मध्ये दिल्लीच्या तख्तावर तुघलक घराणे आले.

कंपली हे बेल्लारी, धारवाड, रायचूर, अनंतपूर, शिमोगा व चितळदुर्ग या विद्यमान जिल्ह्यांचे मिळून दक्षिण भारतातील एक स्वतंत्र राज्य होते. मुहम्मद तुघलकाने १३२६ मधे ते जिंकून तेथील राजपुत्र व सरदार यांना कैद केले आणि इस्लाम धर्माची त्यांना दीक्षा दिली. त्यांत हरिहर व बुक्क हे संगमाचे दोन पुत्र होते. त्यांनी दिल्लीच्या सुलतानाचे दक्षिणेकडील प्रदेशाचे झालेले दुर्लक्ष आणि कंपलीमधील अनागोंदी यांचा फायदा घेऊन स्वधर्म स्वीकारून विजयानगर राज्याची स्थापना केली, असा सर्वसाधारण समज आहे. या संस्थापकांच्या उदयाबद्दल विद्वानांत मतैक्य नाही. काही इतिहासकार संगमाचे हे पुत्र मूळचे कर्नाटकातील होते, असे म्हणतात तर काहींच्या मते ते आंध्रप्रदेशातील असावेत फादर हेरास, बी. ए. सालेतोर व पी. बी. देसाई यांच्या मते ते कर्नाटकातील हिंदू सरदार असून होयसळ तिसरा वीर बल्लाळ याच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्यासाठी ते लढले . के. ए. नीलकंठ शास्त्री, एन्. व्यंकटरमणय्या आणि वी. सूर्यनारायणराव यांच्या मते पे आंध्र प्रदेशातीलच होते. फार्सी कागदपत्रांतून आणि संस्कृत साधनातून हरिहर, बुक्क व इतर बंधू वरंगळ राज्यांच्या पदरी होते, अशीही माहिती मिळते. काकतीय राजधानीच्या पतनानंतर त्यांनी कंपलीच्या राजाची सेवा पत्करली. दिल्ली सुलतानाच्या फौजंनी कंपलिदेव याचा पराभव करून या संगमपुत्रांना कैद करून नेले आणि त्यांना इस्लाम धर्म स्वीकारायला लावला. त्यांची दक्षिणप्रांतावर अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली. या सुमारास विद्यारण्य स्वामींशी त्यांची गाठ पडली. स्वामींच्या प्रभावामुळे त्यांनी पुन्हा हिंदू धर्म स्वीकारला आणि दिल्ली सुलतानाविरूद्ध बंड पुकारून विजयानगरची स्थापना केली. परंपरागत कथा, मुसलमान इतिहासकारांचे–जिया-उद्दीन बरनी व इसामी आणि तत्कलीन कोरीव लेख यांचा विचार केला असता वरील मताला बहुतेक इतिहासकार पुष्टी देतात.

विजयानगर येथे १३३६ ते १६४६ पर्यंत संगम, साळुव, तुळुत्र व आरवीडु या चार घराण्यांनी राज्य केले तथापि १५६५ च्या तालिकोटच्या लढाईनंतर विजयानगरचा वैभवकाळ संपला आणि हे साम्राज्य जवळजवळ संपुष्टात आले. या लढाईनंतर विजयानगरची राजधानी होऊन तेथे एक निराळे राजघराणे राज्य करू लागले.

तालिकोटच्या लढाईत विजयनगरचा पाडाव होऊन त्याचा इतिहास संपला, त्या इतिहासाचें नांवही राहिलें नव्हतें; पण अलीकडे अनेक शोधक विद्वानांच्या प्रयत्नांनी विजयनगरचा बराच इतिहास बाहेर आला आहे. हिंदूंनी मुसलमानांच्या विरुद्ध टिकाव धरण्याचे कित्येक प्रयत्न केले, त्याचा उल्लेख वर ठिकठिकाणी आलाच आहे. त्याचपैकीं देवगिरीचे यादव आणि विजयनगरचे राय ह्यांचे प्रयत्न होत. देवगिरीच्या यादवांचा इतिहास पुढें मराठी रियासतींत दिला आहे. हिंदूच्या पाडावाची व मुसलमानांच्या उत्कर्षाची येथवर केलेली चचर्चा विजयनगरच्या उदाहरणासही लागू पडत असल्याचे दिसून येईल. विजयनगरचा इतिहास जितका मनोवेधक तितका हृदयद्रावकही आहे; आणि कष्टमय परिस्थितींत राष्ट्राला जागृति येण्यास त्याचा थोडाबहुत उपयोग होईल.

तेराव्या शतकाच्या अखेरीस मुसलमानांनीं नर्मदा नदी ओलांडून दक्षिणेंत प्रथम प्रवेश केला. सन १२९३, सन १३०६ व सन १३१८ ह्या तीन सालच्या स्वाऱ्यांत त्यांनीं देवगिरीच्या यादवांचा निःपात केला. सन १३०९ साली मलीक काफूरनें तैलंगणांतील वरंगळचे राज्य आणि इ. सन १३१० त म्हैसुरांतील होयसळबल्लाळांची द्वारसमुद्र राजधानी बुडविली. सन १३२६ त वरंगळचा कायमचा पाडाव झाला. येणेप्रमाणें चौदाव्या शतकाच्या पहिल्या पंचविशींत सर्व हिंदुस्थान मुसलमानमय झालें. जिकडे तिकडे हिंदूंचा पाडाव झाला. हिंदूस वर डोके काढण्याची कांहीं आशा राहिली

नाहीं. पुरातन राज्यें लयास गेलीं. मोठमोठीं मंदिरें जमीनदोस्त झाली. अपार संपत्ति दक्षिणेंतून उत्तरेंत चालून गेली; आणि दक्षिणच्या लोकांस प्राणांहून प्रिय जो त्यांचा धर्म तो सर्वत्र साफ बुडण्याचा समय प्राप्त झाला. अशा संकटसमयीं सन १३४४ त एकाएकीं मुसलमानांच्या तीव्र शक्तीस एकदम मोठा अडथळा झाला आणि पुढें हिंदूंना जिंकण्याचा मुसलमानांचा उद्योग त्यांनी पुढें चालू दिला नाहीं.

विजयनगर हें शहर तुंगभद्रेच्या दक्षिण तीरावर असून, उत्तर तीरावर अनागोंदी हें शहर होतें. त्या ठिकाणीं हल्लीं पुरातन काळचीं अनेक देवळें आहेत. वालीची किष्किंधा नगरी येथेच होती असे म्हणतात. आरंभीं जे युरोपियन लोक येथे आले, त्यांनीं ह्या राज्यास नरसिंहरायाचें राज्य आणि देशास नरसिंहदेश असें नांव दिलें. विजयनगर हें पूर्वी फार दाट वस्तीचे व विस्तीर्ण शहर असून, तेथे परदेशच्या हरएक मालाची देवघेव होत असे. ह्या राज्यांत कृष्णा व तुंगभद्रा या दोन नद्यांच्या दक्षिणेकडील मुलखाचा व मलबार प्रांताचा समावेश होत होता.

**विजयनगरची उत्पत्ति, (सन १३३६)** –

नकाशावर मुंबईपासून मद्रासपर्यंत एक सरळ रेषा काढिली असतां तिच्या जवळ जवळ मध्य बिंदूवर तुंगभद्रा नदी येते. ही ईशान्यवाहिनी नदी कर्नूलच्या खालीं थोड्या अंतरावर कृष्णेस मिळते, त्यास निवृत्तिसंगम म्हणतात. मध्यंतरीं बल्लारीच्या वायव्येस सुमारें चाळीस मैलांवर ती नदी एका लहानशा खडकाळ प्रदेशांतून जाते. बल्लारीहून धारवाडास जाणाऱ्या आगगाडीच्या उत्तरभागी हा प्रदेश आहे. वर सांगितलेल्या खडकाळ प्रदेशांत तुंगभद्रा नदीच्या उत्तर तीरावर पूर्वी अनागोंदी नांवाचें एक छोटेंसें तटबंदी शहर होतें. ह्या ठिकाणीं एक लहानसा राजवंश बरेच दिवस राज्य करीत होता. पुष्कळ दिवस मेहेनत करून अनागोंदीचा किल्ला तेथील राजांनीं चांगला मजबूत केला होता. वर्षभर नदीचा प्रवाह जोरांत वाहत असल्यामुळे, खालींवर लांबपर्यंत नदीस पायउतार नव्हता. वर्षाकालांत तर नदींत मोठमोठे धबधबे होऊन ती दुर्गम होते. अनागोंदीच्या राजवंशाची उत्पत्ति कोठून झाली, हें आज कळून येत नाहीं. पुष्कळ वर्षे ते द्वारसमुद्र येथील होयसळ बल्लाळांचे मांडलिक होते. फेरिस्ता म्हणतो, सन १३५० पूर्वी सातशे वर्षे त्या राजवंशाचा अंमल अनागोंदीस होता. हरिहर व बुक असे दोन बंधु वरंगळच्या राजाच्या पदरी होते. सन १३२६ त वरंगळ पडल्यावर ते अनागोंदीच्या आश्रयास येऊन राहिले. तेथे एकास अनागोंदीची दिवाणगिरी व दुसऱ्यास खजीनदारी मिळून, त्यांचा लवकरच उदय झाला. सन १३३४ त दिल्लीचा सुलतान महंमद तुघ्लख ह्याचा पुतण्या बहुद्दीन बंड करून दक्षिणेत आला; त्यास अनागोंदीच्या राजानें आश्रय दिला, तेव्हां सुलतान महंमदानें अनागोंदीवर स्वारी केली; आणि तें शहर काबीज करून, तेथे मलीक नांवाचा आपला एक कारभारी नेमिला. अशी व्यवस्था करून सुलतान परत गेला. ह्याप्रमाणें अनागोंदीचा पाडाव झाल्यावर हरिहर व बुक यांनी अनागोंदीच्याच समोर तुंगभद्रेच्या दक्षिणतीरावर माधवाचार्य ऊर्फ विद्यारण्य ।। विद्वान् साधूच्या पुरस्कारानें एक नवीन शहर स्थापिलें, आणि त्याचें नांव विजयनगर असें ठेविलें (सन १३३५). तेव्हां अनागोंदी येथील उच्छिन्न शालेले सरदार व प्रजाजन ह्या नवीन शहरांत येऊन राहिले, तेव्हां तें लवकरच भरभराटीस आले. इकडे मलीकच्या हातून अनागोंदीचा बंदोबस्त होईना, तेव्हां सुलतान महंमदानें हरिहर ह्यासच अनागोंदीचें राज्य देऊन, बुक ह्यास त्याची दिवाणगिरी दिली (सन १३४४). अगोदरपासूनच हरिहर व बुक स्वतंत्र होण्याच्या तयारीत होते. त्यांनीं उत्तरेस व दक्षिणेस पुष्कळ मुलूख जिंकला होता. सन १३४० त हरिहरानें बदामी येथे किल्ला बांधिला. ह्यः हरिहरानें स्वतंत्र राज्य न स्थापतां तुघ्लख सुलतानाचा अंकित म्हणून कारभार केला. सन १३४४ त हरिहर मरण पावला. हल्ली नदीच्या कांठीं हंपी म्हणून गांव आहे, त्याच ठिकाणीं विजयनगर शहराचे अवशेष दिसून येतात. हरिहरानें हंपी येथे सुंदर व भव्य मंदिर बांधिलें, तें अजून टिकलें आहे.

**पहिला वंश, (सन १३४४-१४९०)** –

हरिहरानंतर त्याचा भाऊ बुक्क राज्यावर आला (सन १३४४-१३४९). त्यानें छत्तीस वर्षे राज्य करून, तुंगभद्रेपासूनचे सर्व हिंदुस्थान आपल्या ताऱ्यांत आणिलें. मुसलमानांची लाट मागें हटविणारा पहिला राजा हाच होय. त्यानें अवशिष्ट हिंदु राजांचें एकीकरण केलें. सन १३४४ त वरंगळच्या प्रतापरुद्राचा मुलगा कृष्ण नाईक विजयनगरास बुक ह्याजपाशीं येऊन राहिला. त्या दोघांनीं द्वारसमुद्र येथील बल्लाळ राजासही आपणाकडे आणिलें; तसेंच दक्षिणेतील

दुसऱ्या हिंदु राजांशीं मिलाफ करून फौज जमविली, आणि मुसलमानांशीं युद्ध सुरू केलें (पृष्ठ १५६ पाहा ). दिल्लीच्या गंगू ब्राह्मणाजवळ हुसेनखान नांवाचा एक मुसलमान गृहस्थ होता. त्यास महंमद तुघ्लखनें हिंदूंच्या ह्या बंडाचा बंदोबस्त करण्याकरितां दक्षिणेत पाठविलें. तेव्हां हुसेनखान व बुक ह्यांचे झगडे सुरू होऊन, दोघांनीही दक्षिणेंत स्वतंत्र राज्यें स्थापन केलीं. पहिले मुसलमानांचें कलबुर्गा येथील बहामनी आणि दुसरें विजयनगर येथील हिंदूंचे. ह्या दोन राज्यांमध्ये एकसारखे वैरभाव व युद्धप्रसंग चालू होते. त्यांनींच ह्या दोघांचे इतिहास भरलेले आहेत. बहामनी सुलतानांचा पाडाव करण्याकरितां बुक्कानें दिल्लीचा सुलतान फिरोजशहा ह्याची मदत मागितली. पण फिरोजशहाला राज्यविस्तार नको होता, म्हणून त्यानें मदत पाठविली नाहीं. ही गोष्ट बहामनी सुलतानांच्या पथ्यावर पडली. म्हणूनच त्यांस कृष्णेपर्यंतचा प्रदेश सहज काबीज करितां आला. पुढें बहामनी सुलतान व विजयनगरचे राजे ह्यांचा खरा झगडा सन १३६५ त सुरू झाला आणि त्याची समाप्ति सन १५६५ त तालिकोट येथे झाली. फेरिस्ता म्हणतो, मुसलमानांच्या अंगीं शौर्य व प्रखर तेज होतें, म्हणूनच विजयनगरच्या सत्तेपुढें त्यांचा निभाव लागला. बाकी शक्ति, संपत्ति व राज्यविस्तार श्या गोष्टींत विजयनगरचें राज्य बहामनी राज्याहून फारच श्रेष्ठ होतें.

सन १३७९ त बुकराय मरण पावला. पश्चात् त्याची बायको गौरी हिच्या पोटटीं जन्मलेला त्याचा मुलगा हरिहर (दुसरा) गादीवर बसला. त्यानें वीस वर्षे राज्य केलें (सन १३७९-१३९९) हरिहरानें महाराजाधिराज ही पदवी धारण केली. त्यानें अनेक मंदिरें बांधून त्यांस नेमणुका ठरवून दिल्या. माधवाचार्यांचा भाऊ सायण्णाचार्य हा हरिहराचा दिवाण होता. मुद्द, इसग, गुंड ह्या नांवांचे हरिहराचे सेनापति होते. मल्लादेवी ऊर्फ मल्लांबिका नांवाची हरिहराची पट्टराणी होती. तो स्वतः शंकरभक्त असून, इतर पंथांचा द्वेष करीत नसे, हरिहराचे शिलालेख हिंदुस्थानच्या दक्षिण टोंकापर्यंत सांपडलेले आहेत आणि त्यांवरूनच त्याचा इतिहास उपलब्ध झाला आहे. सन १३९९ त हरिहराचा मुलगा (दुसरा) बुक्क गादीवर बसला (सन १३९९-१४०६). नंतर बुक्काचा भाऊ देवराय (पहिला) त्यानें सन १४०६ पासून १४१२ पर्यंत राज्य केलें. हा देवराय विषयी होता. मुद्गल येथील एका हिंदु शेतकऱ्याच्या सुरूप मुलीचा त्यानें अभिलाष धरिल्यामुळें, बहामनी सुलतानाशीं युद्ध सुरू होऊन, विजयनगरचें राज्य त्याचे हातून जाण्याचा प्रसंग आला होता. अशा स्थितींत देवरायानें सुलतानास पुष्कळशी संपत्ति, बंकापुरचा किल्ला आणि आपली मुलगी देऊन, कसाबसा आपला बचाव करून घेतला. शेतकऱ्याच्या त्या सुंदर मुलीनेंही सुलतानाच्या मुलाशीं लग्न केलें.

पहिला देवराय सन १४१२ त मरण पावल्यावर त्याचा मुलगा वीरविजय ह्यानें सन १४१९ पर्यंत राज्य केलें. नंतर वीरविजयाचा वडील मुलगा दुसरा देवराय ह्यानें सन १४१९ पासून १४४४ पर्यंत राज्य केलें. ह्या काळांत बहामनी सुलतानांशीं ह्या रायाचें एकसारखें युद्ध सुरू होतें. नागण्णा नांदाचा देवरायाचा एक दिवाण असून, त्यास 'धननायक' अशी पदवी होती. देवरायाच्या वेळेस विजयनगरची भरभराट कळसास पोचली. देवराय मरण पावल्यावर सन १४४४ पासून १४४९ पर्यंत तिसरा देवराय नावाचा एक राजा झाला असावा. पुढें देवरायाचे मुलगे मल्लिकार्जुन व विरूपाक्ष, आणि त्यानंतर मल्लिकार्जुनाचे मुलगे राजशेखर व विरूपाक्ष इतक्या पुरुषांनीं मिळून सन १४४९ पासून सन १४८७ पर्यंत राज्य केलें. त्यांच्या कारकीर्दीचे सन अद्यापि निश्चित झालेले नाहींत. सन १४८७ च्या सुमारास राज्यक्रांति होऊन, नरसिंहाय नांवाच्या दुसऱ्या एका कुटुंबांतील पुरुषानें राज्यापहार केला (सन १४९०), शेवटच्या चाळीस वर्षांत निकराचे युद्धप्रसंग फारसे झाले नाहींत. बहामनी राज्यांतही अंतःकलह व घोंटाळे माजले होते. ह्याच वेळेस बहामनी राज्याचा कारभार प्रसिद्ध वजीर महंमद गवान ह्याच्या हातांत होता. येणेंप्रमाणें सन १३४४ पासून सन १४९० पर्यंत सुमारें दीडशें वर्षे त्या पहिल्या राजवंशाकडे विजयनगरचें राज्य चाललें.

**दुसरा वंश, (सन १४९०-१५६७)** —

विरूपाक्षराय हा दुर्बल व दुर्वृत्त होता. त्याच्या वेळेस गोवा, चौल, दाभोळ वगैरे प्रांत मुसलमानांनीं काबीज केले. दरवारांत बेर्डे झाली, त्यांत विरूपाक्ष व त्याचे मुलगे मारले गेले, त्याच्याच पदरीं शाल्ववंशी नरसिंहराय म्हणून एक शूर सरदार होता, त्यास दरबारच्या मंडळींनीं राज्यावर बसविलें, त्यास राज्यावर येण्यापूर्वी महामंडलेश्वर, मेदिनीश्वर वगैरे सेनापतीचे किताब होते. सन १४९५ तील एका शिलालेखांत त्यास महाराय अशी पदवी दिलेली

आढळते, म्हणजे त्या वेळेस तो 'राजा' असला पाहिजे. नरसिंहरायास राज्य प्राप्त झाल्यापासून मुसलमानांच्या स्वायऱ्यांचा बराच बंदोवस्त झाला आणि विजयनगरचा प्रभाव पूर्ववत् चमकू लागला. ह्या वेळेच्या इतिहासाचे मुख्य आधार फेरिस्ता व पोर्तुगीझ लोकांनी लिहिलेले वृत्तान्त आहेत. त्यांच्यामध्यें पुष्कळ तफावत आहे. नरसिंहरायाच्या वंशांत खालील पुरुष राज्यावर बसले. नरसिंह व वीरनरसिंह (१४९०-१५०९); कृष्णदेवराय (१५०९-१५३०); अच्युतराय (१५३०-४२); आणि सदाशिवराय (१५४२-१५६७).

न्यूनिझ नांवाचा एक पोर्तुगीन गृहस्थ अच्युतरायाच्या वेळेस विजयनगरांत राहात होता. त्यानें आपला वृत्तान्त सन १५३५ च्या सुमारास लिहिला आहे. मुसलमान इतिहासकार फेरिस्ता अहंमदनगरास, निजामशहाच्या पदरी राहत होता, त्याचा वृत्तान्त सन १६०७ च्या पुढे लिहिलेला आहे. अर्थात् फेरिस्त्यापेक्षां न्यूनिझचा वृत्तान्त ज्यास्त अगोदरचा व विश्वसनीय आहे.

नरसिंहराय सन १४९० त राज्य करूं लागला, परंतु त्या पूर्वी ३०-४० वर्षे तो राज्याचा कारभार मुखत्यारीनेंच पाहत होता. सन १४९० च्या सुमारास बहामनी राज्याचे विभाग होऊन स्वतंत्र झालेले अंमलदार एकमेकांशीं झगडू लागले. विजापुरच्या आदिलशहाचें व विजयनगरच्या राजांचें बहुतेक कायमचेंच युद्ध जुंपलें. बेदर येथे स्वतंत्र झालेला कासिम बेरीद ह्यानें यूसुफू आदिलशहाची खोड मोडण्याकरितां नरसिंहरायाची मदत मागितली. नरसिंहरायानें आदिलशहावर स्वारी करून त्याचीं रायचूर व मुद्‌गल हीं दोन शहरें काबीज केलीं (सन १४९३). नरसिंहरायानें राज्यास पुष्कळ बळकटी आणिली.

सन १५०९ त कृष्णदेवराय गादीवर बसला. विजयनगरच्या एकंदर राजांत च्या कृष्णदेवाचो कीर्ति फार मोठी आहे. न्यूनिझ ह्या पोर्तुगीझ गृहस्थानें त्याच्या दरबारों राहून प्रत्यक्ष पाहिलेला वृत्तान्त लिहून ठेविला आहे. हरएक शारीरिक कसबांत कृष्णदेव प्रवीण होता. तसाच तो शूर व उदार होता. सर्व दक्षिण हिंदुस्थान त्याच्या तान्यांत असून दुसरे पुष्कळ राजे त्यास करभार देत असत. त्याच्याच कारकीर्दीत राज्याचा विस्तार फार झाला. प्रसिद्ध विद्वान् अप्पय्या दीक्षित कृष्णरायाचे पदरी होता. हंपी येथील देवालयासमोर त्यानें बांधिलेले दोन मनोरे अद्यापि शाबूद आहेत. इंग्लंडचा राजा आठवा हेन्री हा त्याचा समकालीन असून अधिकार, ऐश्वर्य, स्वेच्छाचार इत्यादि बाबतींत दोघांचें बरेंच साम्य आहे. पोर्तुगीझ लोकांनी आदिलशहापासून गोवें काबीज केलें, हे पाहून कृष्णरायास समाधान वाटलें, स्या वेळच्या विजयनगरच्या भरभराटीचे वर्णन अनेक पोर्तुगीझ गृहस्थांनीं केलें आहे. कृष्णरायानें तैलंगण प्रांत काबीज केला. त्याच्या कारकीर्दीतील मोठी गोष्ट म्हणजे रायचूरची लढाई होय. रायचूर व मुद्‌गल हे परगणे कृष्णा व तुंगभद्रा ह्यांच्या दुआबांत आहेत. या परगण्यांबद्दल मुसलमान व हिंदु ह्यांचा नेहमीं कलह चालला. सन १५२० च्या मे महिन्यांत कृष्णदेवानें रायचूरवर स्वारी केली. तेव्हां त्याजबरोबर लढण्यास आदिलशहा मोठी फौज घेऊन आला. लढाई निकराची झाली. कृष्णदेवानें मोठ्या शिकस्तीनें मुसलमानांचा पराभव करून त्यांच्या सर्व फौजेचा फन्ना उडविला, आणि रायचूरचा किल्ला काबीज केला. ह्या विजयानें आदिलशहाची कंबर खचली आणि दक्षिण हिंदुस्थानांत आतां आपली धडगत नाहीं असें तेथील मुसलमानांस वाटूं लागलें. त्यामुळेच ते पुढें हिंदूंच्याविरुद्ध मुसलमानांची एकी करण्याच्या उद्योगास लागले, तेर्णेकरून तालिकोटचें अरिष्ट ओढवलें, इकडे विजयनगरचे लोक गर्वानें फुगून गेले आणि मुसलमानांस तुच्छ लेहूं लागले, त्यामुळे त्यांना भावी संकटाचें भान राहिलें नाहीं. गोव्याच्या पोर्तुगीझ खत्तेबा अभ्युदयही विजयनगरच्या भरभराटीवर अवलंबून होता आणि विजयनगरच्याच ब्यापारावर गोव्याची भरभराट अवलंबून होती. अर्थात् विजयनगर नष्ट झाल्याबरोबर गोव्याच्या भरभराटीचाही अंत झाला. पराभव झाल्यावर कृष्णदेवानें आदिलशहाचा पुष्कळ अपमान केला, त्यामुळें मुसलमानांचीं मनें फार चिडून गेलीं. सन १५३० त कृष्णदेव वारला. कृष्णदेव राज्यावर असतांच दिल्लीस मोगल बादशाहीची स्थापना झाली. कृष्णदेवानें सन १५१३ त कृष्णस्वामीचे मंदिर बांधिले हजाररामस्वामी नांवाचे दुसरें एक मंदिर सुरू केलें, आणि कित्येक मोठमोठे कालवे बांधून शेतीची सोय केली. विजयनगर येथे त्यानें मोठा तलाव बांधला. नागलादेवी नांवाची त्याची एक राणी होती, तिच्या स्मरणार्थ नागलापुर नांवाचा शहराचा एक नवीन भाग त्यानें विजयनगरास बांधिला. कृष्णस्वामीच्या देवळाजवल नृसिंहाचा एक प्रचंड दगडी पुतळा हल्लीं दृष्टीस पडतो. तो त्यानेंच सन १५२८ त कोरविला. तो सबंध एका दगडाचा कोरलेला असून सुमारें पंचवीस फूट उंच व १६।१७ फूट रुंद आहे.

हल्लीं त्याचे हात वगैरे तुटलेले आहेत, ते मुसलमानांनीं विजयनगर काबीज केलें त्या वेळींच तोडले असावे. ह्या सर्व मंदिरांस त्यानें नेमणुका वगैरे करून दिलेल्या होत्या, असें त्यांच्या कोरॉंव लेखांवरून कळून येतें.

**तिसरा वंश, रामरायाचा उद्य- रंगराय ऊर्फ तिम्मा**

तिमराज ह्या नांवाचा कृष्णरायाचा एक हुशार प्रधान होता. तिमराजानें विजापुरच्या आदिलशहाशीं पुष्कळ लढाया मारून विजयनगरची भरभराट केली. कृष्णदेवराया- नंतर त्याचा भाऊ अच्युतराय गादीवर बसला. त्यानें सन १५३० ते १५४२ पर्यंत राज्य केलें. तो अगदीं भित्रा आणि राज्याला नालायक होता. त्याच्या वेळेस राज्यास उत्तरती कळा लागली. आरंभींच मुद्गल व रायचूर है परगणे आदिलशहानें काबीज केले. ते पुनरपि हिंदूंच्या ताब्यांत आले नाहींत, अच्युतरायाच्या दुष्ट वर्तनानें त्याचे सर्व साह्यकर्ते नाखूष झाले, त्यामुळे त्यास इतके शत्रु उत्पन्न झाले कीं, त्यांच्या बंदोबस्तासाठीं त्यास आदिलशाहाची सुद्धां मदत मागावी लागली, सर्व सत्ता दिवाणाच्या हातांत होती. दिवाण तिम्मा ऊर्फ रंगराय ह्यास तीन मुलगे होते. थोरला रामराय, दुसरा तिरुमल व तिसरा व्यंकटाद्रि. वडील रामराय ह्यास कृष्ण- देवरायाची मुलगी तिरुमल्लम्मा ही दिलेली होती; आणि त्याची दुसरी मुलगी त्याचा भाऊ तिरुमल ह्यास दिली होती. हा रामराय मोठा धूर्त होता आणि त्यानें आपणच राज्य मिळविण्याची खटपट सुरू केली. तींत त्याचा भाऊ तिरुमल ह्याची त्यास मदत होती. ह्या कामीं तिरुमलनें आदिलशहाची मदत मागितली, त्याप्रमाणें आदिलशहा विजयनगरास आला. तेव्हां त्यास पुष्कळ संपत्ति देऊन रामरायानें परत लाविलें (सन १५३६). ह्या वेळेस आदिलशहाचा वजीर आसदखान हा विजय- नगरचें राज्य बुडविण्याविषयीं मोठी खटपट करीत होता. सन १५४२ त अच्युतराय मरण पावला. त्यास सदा शिवराय म्हणून एक पुतण्या होता. त्यास गादीवर स्थापून रामराय, तिरुमल व व्यंकटा द्रि ह्यांनी सर्व राज्य आपल्या हातांत घेतलें, अच्युत- रायाच्या कारकीर्दीत, विठ्ठलस्वामीचे मंदिर पुरें झालें. इकडे पोर्तुगीझांची सत्ता वाढत चालली होती. विजयनगरशीं त्यांचे सख्य होतें, तरी फायद्याची वेळ आली म्हणजे पोर्तुगीझ लोक करार वगैरे सर्व गुंडाळून ठेवून पाहिजे तीं कारस्थानें करीत.

**तालिकोटची लढाई, (२-१-१५६५) —**

सदाशिवराय सन १५४२ पासून सन १५६७ पर्यंत गादीवर होता. पण त्याच्या हातांत काडीइतकी सत्ता नव्हती. तो बहुतेक बंदिवासांतल्यासारखा होता. तथापि कागदोपत्रीं मात्र त्याचें नांव चालत असे आणि वर्षांतून एक दिवस तिघे प्रधानबंधु राजास जाऊन मुजरा करीत. मुसलमान सुलतानांचे व विजयनगच्या अधिकाऱ्यांचे व्यवहार उत्तरोत्तर अधिकाधिक चुरसीनें चालू लागले. त्यांत रामरायाचें वर्तन अतिशय उद्दाम- पणाचें व मुसलमानांस चीड येण्यासारखें झालें. रामराय मुसलमानांच्या मुलखावर हात मारू लागला. दक्षिणेंतही त्यानें आपली सत्ता फार वाढविली. त्यानें पुष्कळ नवीन फौज चाकरीस ठेवून राज्यास बळकटी आणिली. बहामनी राज्याच्या शाखांत सदा वैरभाव चालत असल्यामुळे रामरायाचें चांगलें फावलें. दक्षिणचे सर्व मुसलमान राजे त्याच्या कुमकेची अपेक्षा करूं लागले. त्याच्या साल्याशिवाय कांहीं चालेनासें झालें. अली आदिलशहास मदत करण्याकरितां ज्या दोन स्वाऱ्या रामरायानें महाराष्ट्रावर केल्या, त्यांत त्याचें वर्चस्व व हिंदु फौजेचें गर्विष्ठपणाचें आचरण एकंदर मुसलमानांस दुःसह झालें. सर्व मुसलमानी राजांचे वकील रामरायाचे पदर्दी असत. त्यांना तो पूर्वीप्रमाणें सभ्यपणानें वागवीनासा झाला. तेव्हां त्या वकिलांनींही रामरायाविरुद्ध आपल्या धन्याकडे तक्रारी केल्या. शिवाय अली आदिलशहा व कुल्ब्रशहा ह्यांचीं राज्यें विजयनगरच्या सरहद्दीवर असल्यामुळे त्यांस रामरायाकडून नेहमींच उपद्रव पोंचे. रामरायाच्या या उपद्रवास अली आदिलशहा व त्याचा वजीर किश्वरखान हे फारच कंटाळून गेले, आणि रामरायाचा नाश करण्याची त्यांनी तोड काढिली. किश्वरखानानें निरनिराळ्या दरबारी जाऊन सर्व घाट जमवून आणिला. आदिलशहानें अमीरउमरावांचा दरबार नरवून भाषण केलें कीं, "हिंदु लोक अलीकडे गर्विष्ठ होऊन मुसलमानांची मानहानि करीत आहेत, म्हणून सर्वांनीं एकजुटीनें त्यांचे पारिपत्य करण्यास झटलें पाहिजे. यश आल्यास ठीकच. अपयश आल्यास धर्मसंरक्षणार्थ मृत्युमुखीं पडणें हेंही पुण्यच आहे.' किश्वरखानानें सुचविलें कीं, 'सर्व मुसलमान राजे एकचित्त झाल्याशिवाय रामरायाचा पाडाव होणें शक्य नाहीं. कारण विजयनगरचा अंमल तुंगभद्रेपासून तहत रामेश्वरापर्यंत असून मुलूख आबाद आहे. त्याच्या ताब्यांत शेंकडों बंदरें असून

व्यापाराची घडामोड मोठी चालते. राज्याचा वसूल २० कोटि आहे. तेव्हां अशा प्रबळ राजाचा नाश एकट्याच्या हातून होणे शक्य नाहीं.' येणेंप्रमाणें वाटाघाट होऊन ह्या कामांत सर्व मुसलमान राजांची एकी करण्याचे ठरलें.

किश्वरखानानें कुल्ब्राहाकडे एक विश्वासू इसम पाठविला. कुत्वाहास हिंदूंपासून वारंवार उपद्रव होत असल्यामुळे, त्यानें वरील मसलतीस खुषीनें आपले अनुमोदन देऊन, ह्या कामीं हुसेन निजामशहाचें साह्य मिळवून देण्याची खटपट आपण पत्कारली. हुसेन निजामशहाही लागलीच ह्या गोष्टीस कबूल झाला. सर्वांची मनें शुद्ध राहावी ह्यासाठीं हुसेनशहानें आपली कन्या चांदबिबी अली आदिलशहास दिली. आदिलशहानें आपली बहीण हुसेनचा मुलगा मूर्तुजा ह्यास दिली. अली बेरीदशहाही ह्या कटांत सामील झाला. हे चौघे राजे सन १५६४ सालीं आपापल्या फौजांसह विजापुर शहरांत एकत्र जमले.

युद्ध सुरू होण्यास कांहीं तरी निमित्त पाहिजे, म्हणून अली आदिलशहानें आपले वकील रामरायाकडे पाठवून मुद्गल, रायचूर व बागलकोट वगैरे किल्ल्यांची त्याजपाशीं मागणी केली. अगोदर भाकित केल्याप्रमाणें रामरायानें वकिलांस धिक्कारून परत लाबिलें. तेव्हां सर्व मुसलमानी फौजा विजयनगरकडे चाल करून तालिकोटपर्यंत गेल्या. तालिकोट डोण नदीच्या कांठीं- ती नदी कृष्णेस मिळते त्याच्या बर साठ मैल आहे.

रामरायास ह्या अरिष्टाची फारशी परवा बाटली नाहीं. दोनशे वर्षे हिंदूंचा पाडाव करण्याचे प्रयत्न चालले ते सर्व निष्फळ झाले, हें लक्षांत आणून ह्या वेळीं सर्व हिंदु लोक अगदीं बेफिकीर होते. लोकांचे नेहमींचे व्यवसाय निर्धास्तपणें चालू होते. दरएक बंदरांतून बैलांचे तांडे विपुल माल भरून विजयनगरास येत होते. आपणांस पुढे धोका आहे अशी त्यांस यत्किंचित् कल्पना नव्हती. राजा सदाशिवराय विचारा आपल्या कोठडींत पडून होता. रामराय जरी बेफिकीर होता तरी त्यास ह्या सर्व गोष्टींची खबर होतीच. तो स्वस्थ बसला नव्हता. त्यानें बिलकूल न डगमगतां आलेल्या संकटांतून पार पडण्याची कडेकोट तयारी चालविली. तिरुमलराय व व्यंकटादि ह्या दोन शूर भावांच्या हाताखालीं त्यानें मोठ्या फौजा तयार करून आपण सेनाधिपत्य स्वीकारिलें. कृष्णानदीवरील मुसलमानांचा उत्तार बंद करण्यासाठीं त्यानें तिरुमलरायास मोठी फौज देऊन तेथे ठेविलें. पण मुसलमानांनीं त्यास फसवून एकच उतार होता तो स्वाधीन करून घेतला, आणि ते विजयनगरच्या मुलखांत शिरले. दोनही पक्षांच्या प्रचंड फौजा जमल्या. मुसलमान लेखकांचे आंकडे सर्वथेव असंभवनीय आहेत, तरी एकंदरीत दोनही बाजूंचा सेनासमूह अवाढव्य होता, ह्यांत संशय नाहीं. मुसलमानांनी हिंदुस्थानांत एकामागून एक प्रांत जिंकिले. दिल्लीचा अकबर बादशहा सर्व हिंदुस्थानांत एकछत्री मुसलमानी राज्य स्थापन करण्यास हरप्रयत्न करूं लागला होता. नांव घेण्यासारखें विजयनगरचें हिंदु राज्य मात्र आजपर्यंत मुसलमानांशी टक्कर देऊन राहिलें होतें. त्याचा कैवार घेणारें दुसरें राज्य त्या वेळेस नव्हतें; आणि तेव्हांपासून आजमितीपर्यंत इतकें प्रबळ हिंदु राज्य मराठशाहीशिवाय दुसरें झालें नाहीं. राष्ट्राच्या इतिहासाचें स्वरूप बदलून टाकणारे असे जे घनघोर युद्धप्रसंग प्रसिद्ध आहेत, त्यांत तालिकोटच्या ह्या संग्रामाची गणना आहे. ह्या वेळीं धर्माभिमान व राष्ट्राभिमान जागृत ठेवण्यास मुसलमान लोक अतोनात झटले.

पराभवेब्दे माधेच शुक्ल पक्षेच पंचमी। शुक्रवारेच माध्यान्हे रामराजो रणे इतः ।' अशी ह्या लढाईची मिति उपलब्ध झाली असून शुक्रवार, ता. २ जानेवारी राम १५६५ रोजीं दोनही फौजा लढाईस सज्ज होऊन उभ्या राहिल्या. दोनही पक्षांकडे पुष्कळ तोफा होत्या. मुसलमानांकडील तोफखानेवाला प्रसिद्ध चलीवी रुबीखान हा होता. उभय पक्षांनी फौजेची व्यवस्था फार काळजीपूर्वक ठेविली. मुसलमानी सैन्य, उजव्या बाजूस अली आदिलशहा, डावे बाजूस अली बेरीदशहा व इब्राहीम कुत्वाहा, आणि मध्यभागीं हुसेन निजामशहा, अशा व्यवस्थेनें उसे राहिलें, सर्वांच्या पुढें सांखळीनें बांधून तोफा उभ्या केल्या होत्या. इकडे हिंदूंच्या फौजेत डाव्या म्हणजे पश्चिम बाजूस तिरुमल, उजव्या बाजूस व्यंकटाद्रि, आणि मध्यभागी स्वतः वृद्ध रामराय होता. रामराय सर्वांच्या मार्गे पालखींत बसून लोकांस उत्तेजन देत होता. कांहीं वेळानें पालखींतून उतरून तो एका रत्नजडित आसनावर बसला, आणि समोर मोहोरा, रत्नें व रुपये ह्यांचे ढीग घालून जे कोणी शिताफीनें लढतील त्यांस बक्षीस देण्यास मी येथे बसलों आहे, असें तोंडानें तो सर्वांस सांगत होता. लढाईत मुख्य सेनापतीनें असें पायीं राहणें अतिशय धोक्याचें असतें. कांहीं वेळपर्यंत दोनही पक्षांचं अगदीं कडाकडीचें युद्ध झालें.

प्रथमतः मुसलमानांची फार धांदल उडाली, पण हुसेन निजामशहा मध्यभागाची रामरायाची फळी फोडून त्याच्या अंगावर घांबला. रामराय सत्तर वर्षांचा होता. तो चटकन् पालखींत चढला; पण निजामशहाचा एक मस्त हत्ती त्याच्या अंगावर धावून जातांच भोई पालखी टाकून पळाले. नंतर रामराय घोड्यावर चढत असतां त्यास शत्रूनीं पकडून तोफखान्याचा अधिकारी चलीबी रुमीखान ह्याजकडे नेलें. रुमीखानानें त्यास निजामशहाकडे रवाना केलें. निजामशहानें त्याचे शिर कापून तें भाल्यास टोचून शत्रूस कळविण्यासाठीं चोहोंकडे फिरविलें, हिंदूंनीं आपला राजा मेला असें पाहिलें, तेव्हां ते निराश होऊन लढाई टाकून पळाले. त्या वेळीं मुसलमानांनीं त्यांची अशी चंदी उडविली कीं, सर्व समरांगण व नदी रक्तानें भरून गेली. एकंदर एक लक्षावर हिंदु लोक मारले गेले. कृष्णेच्या उतारावर लढाई ज्या ठिकाणी झाली तेथे रक्कसगी व तंगडगी अशी दोन गांवें असून त्यावरून ह्या लढाईस राक्षसतागडीची लढाई ही संज्ञा बखरकारांनी दिली आहे. तालिकोट तेथून थोडें दूर ईशान्येस ३० मैल डोण नदीच्या कांठीं आहे.

हिंदु फौजा विस्कळित झाल्याबरोबर त्यांची धांदल उडून त्या परत विजयनगरांत येऊन घुसल्या. जरा शांत वृत्ति कायम ठेवून त्या सर्वांस परत फिरवून पुनरपि मुसलमानांशीं सामना करण्याचा प्रयत्न कोणी केला असता, तर पुढील भयंकर परिणाम पुष्कळ अंशीं टळले असते. पण इतकी व्यवस्था व लढाईची शिस्त हिंदूच्या ठिकाणीं नव्हती.

**लढाईचा भयंकर परिणाम**

तालिकोटास घडलेल्या अनर्थाची बातमी राजधानीस पोचण्यास विलंब लागला नाहीं. शहरच्या लोकांस त्याची कांहीं एक कल्पना नव्हती. ते आपल्या नेहमींच्या व्यवसायांत निमग्न होते. पराभव झालेला ऐकून सुद्धां पुढें कांहीं विपरीत प्रकार होईल अशी कल्पनाही त्यांस शिवली नाहीं. नेहमीप्रमाणें मोठासा दंड घेऊन मुसलमान परत जातील, आणखी काय करणार अशी त्यांस खात्री होती. सरकारी खजिना तुडुंब भरलेला होता. तेव्हां मुसलमान मागतील तो दंड देण्यास कांहीं अडचण नव्हती. परंतु ह्या भ्रमाचा लवकरच निरास झाला. पराभव पावलेले लोक घाबरून येऊन शहरांत घुसले. त्यांजबरोबर राजकुटुंबांतले पुरुषही पुष्कळ होते, त्यांनी प्रथम त्वरा करून होती नव्हती तेवढी संपत्ति हत्तींवर लादून, तिच्यासह दक्षिणेकडे पलायन केलें. त्यांजबरोबर साडेपांचरों हत्ती संपत्तीनें भरून गेले. सदाशिवरायास घेऊन तिरुमलट्टी अशाच प्रकारें पळून गेला. श्यामुळे शहरांतील गरीब प्रजा शत्रूच्या तावडींत आयतीच सांपडली. हा नुसता पराभवच नव्हे, तर सर्वस्वाचा संहार होय. लोकांस कोणी त्राता राहिला नाहीं, पळून जाण्यास वाट नाहीं व सर्व रस्ते गोणीच्या बैलांनीं भरलेले होते. अशा स्थितीत दुसऱ्या दिवशीं दरोडेखोरांच्या टोळ्या शहरांत घुसल्या, आणि भराभर लूट करूं लागल्या.

कृष्णाकांठच्या युद्धस्थलापासून तुंगभद्रातीरचें विजयनगर सुमारे ७५ मैल थेट दक्षिणेस होतें. ह्या राजधानीवर मुसलमानांच्या विजयी फौजा लगोलग आल्या नाहींत म्हणून बरें. एक दिवस विश्रांति घेऊन त्या तिसऱ्या दिवशीं शहरांत आल्या. त्या दिवसापासून पुढें पांच महिनेपर्यंत त्या दुर्दैवी शहराची विटंबना चालू होती. या वेळीं मुससमान लोक शहरांत कांहीं शिल्लक ठेवण्याकरितां आले नव्हते. त्यांनीं लोकांची साफ कत्तल केली; देवळें व वाडे पाडून जमीनदोस्त केले. एवढ्या सुंदर व विस्तीर्ण शहरापैकी दगडांच्या राशी मात्र आज दिसून येतात, तसेंच नृसिंहाचा तो प्रचंड दगडी पुतळा हात वगैरे तुटलेला दिगुन येतो. सुंदर व नकशीचें काम सर्व नाहींसें झालें. विठ्ठलस्वामीच्या मंदिरांत त्यांनीं होम पेटवून दिला. अनि, तलवार, कुन्हाडी, पहारा इत्यादिकांचा प्रयोग सारखा चालू होता. जगाच्या इतिहासांत अशा भयंकर प्रळयाचें उदाहरण कचित्च सांपडेल. लुट किती मिळाली ह्याची तर गणतीच नाहीं. कित्येक शतकेंपावेतों जेवढी म्हणून संपत्ति विजयनगरास जमली होती, तेवढी सर्व मुसलमानांसं मिळाली. चारही मुसलमान सुलतानांच्या बरोबर जितके लोक लढाईस आले होते, त्यांतील प्रत्येक इसम धनाढ्य होऊन, स्पाजपाशीं सोनें, रत्नें, सामान, तंबू, हत्यारें, घोडे व गुलाम ह्यांचा विपुल संचय झाला. लुटीपैकी हत्तीमात्र सुलतानांनी स्वतःकरितां घेतले, बाकी सर्व संपत्ति अपहारकांस दिली. आदिलशहास एक मोठा हिरा सांपडला, तो कोंबडीच्या अंब्याएवढा होता.

त्याप्रमाणें विजयनगर शहर मुसलमानांनीं लुटून त्यांतील सर्व इमारती जमीन- दोस्त केल्या. लोकांवर नानाप्रकारचे जुलूम केले. सर्व देश उजाड पाडिला. व्यंकटाद्रि पळून दूर एका अरण्यांत जाऊन लपून राहिला, तेथून त्यानें लढाई

तहकूच करण्याविषयीं मुसलमानांस आग्रहपूर्वक विनंति केली. पुढें तोही मारला गेला. साऱ्या देशाची धूळ केल्यावर मुसलमान राजे रायचुरास एकत्र होऊन परत आपआपल्या देशीं गेले.

ह्या लढाईनें विजयनगरच्या साम्राज्याचा शेवट झाला. तेथील राज्यानें पुनः कधीं वर डोकें काढिलें नाहीं. शहराचा सर्वस्वीं नाश होऊन लोक तें सोडून गेले. हल्लीं तेथे हजारों पडक्या इमारती मात्र पूर्वीच्या वैभवाची साक्ष देतात. सीझर फेड्रिक नांवाचा एक इटालियन प्रवासी सन १५६७ त विजयनगरास आला होता, तो म्हणतो, ' जिकडे तिकडे मोडकीं तोडकीं घरें वाटेल तितकीं रिकामीं पडलीं आहेत, त्यांत राहण्यास माणसें नाहींत, व्याघ्र वगैरे हिंस्र पशु त्यांत राहतात.' तिरुमलरायानें पुनः शहर बसविण्याचा प्रयत्न केला, पण तो सफळ झाला नाहीं. पूर्वीच्या विजयनगरच्या स्थलावर हल्लों लहान लहान खेडीं बसलीं असून, त्या वेळच्या कालव्यांवर लोकांनीं बागाईत व शेती केली आहे.

**पुढील राजवंशांचे अवशेष —**

सदाशिवराय व तिरुमल पेनकोच्यास कांहीं दिवस राहिले. पण विजयनगरच्या ताब्यांतले मांडलिक सरदार त्यांस अनुकूल झाले नाहींत. ते आपापल्या जागीं संधि साधून स्वतंत्र कारभार करूं लागले. विजयनगर पडल्यामुळे पोर्तुगीझांचा व्यापार बसला. सन १५६७ त सदाशिवरायाचा खून करून तिरुमल पेनकोंड्यास स्वतंत्र झाला. तिरुमल विद्वान व शूर होता. त्याचे पश्चात् वडील मुलगा श्रीरंग गादीवर बसला. पण मुसलमानांनीं त्याचा उच्छेद करून पेनकोंडा व त्याच्या उत्तरेकडचा सर्व प्रदेश हस्तगत केला. पुढे त्यांनीं श्रीरंगास कैद केलें (सन १५७९-८०), तेव्हां पेनकोंब्याचे आग्नेयेस सुमारें १५० मैल चंद्रगिरि l येथे राजधानी नेण्यांत आली. श्रीरंग सन १५८६ त मरण पावला. नंतर त्याचा भाऊ व्यंकटपति ह्यानें सन १६१४ पावेतों राज्य केलें. ह्याच्या ताब्यांत चंद्रगिरि, श्रीरंगपट्टण, मदुरा असे सुभे असून त्यांजवरील अंमलदारांस नाईक म्हणत. त्यांपैकीं म्हैसूरचा सुभेदार बोडियार म्हणून होता, स्यानें श्रीरंगपट्टण इस्तगत केलें, तेव्हां व्यंकटपतीनें तेथेच त्यास कायम करून त्या सुभ्याची नवीन सनद दिली. हाच वोडियार हल्लींच्या म्हैसूरच्या राजघराण्याचा पूर्वज होय. व्यंकटपतीच्या पश्चात् श्रीरंग ऊर्फ चिकराय गादीवर बसला, तेव्हांपासून चंद्रगिरि व म्हैसूर ह्यांचे कलह वाढून, त्यांत शेवटीं चंद्रगिरीच्या राजवंशाचा म्हणजे परंपरेनें विजयनगरच्या हिंदु गादीचा अस्त झाला. अर्थात् विजयनगरची परंपरा हल्लींच्या म्हैसूर राज्यांत उतरली आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. विजयनगरास अनेक राजवंश झाले. त्यांच्या वंशावळी डॉ० ऐयंगारचे पुस्तकांत विस्तृत दिलेल्या पूर्वीच्या राजकारणाचे धागे शोधण्यास उपयोगी पडतील. श्रीरंगाच्या दोघां मुलांस शिवछत्रपतीनें नेमणुका करून दिल्या होत्या.

चंद्रगिरीच्या रंगरायानें हल्लींच्या मद्रास शहराची जागा सन १६३९ त ईस्ट इंडिया कंपनीस विकत दिली. मदुरा व तंजावर येथे ह्या नाइकांनीं कांहीं दिवस स्वतंत्र राज्ये केली. त्यांपैकी सन १७५६ सालीं तिरुमलराय अधिकारापन्न असतां त्याचा मुलुख हैदरअलीनें जिंकून घेतला, तो त्यानें पुनः परत मिळविला. टिपूचें राज्य इंग्रजांनी घेतल्यावर तिरुमलरायाचा मुलूख कंपनी व निजाम यांनीं बांडून घेतला, आणि तिरुमलरायास दरमहा १५०० रुपये नेमणूक करून दिली. तरी निजामानें आपणाकडे आलेल्या मुलखांपैकी अनागोंदी शहर व सभोंवतालचा कांहीं प्रदेश तिरुमलरायाकडे जहागिरीदाखल ठेविला. तिरुमलरायाचा पुत्र रामराय हा अल्पवयी असतां सन १८२९ सालीं मरण पावला, तेव्हां जहागीर व नेमणूक कमी झाली. हलीं पंपापतिराय व कुमारराघव असे तिरुमलरायाचे दोन बंशज अनागोंदीस हैदराबादच्या निजामाचे ताबेदार आहेत. त्यांजपाशीं जुन्या वैशावळी व कागद आहेत.

८. या हिंदु राज्याचें सिंहावलोकन. (क) माधवाचार्याची अपूर्व योजना - विजयनगरच्या राज्यांत प्रधान, सेनापति वगैरे कामें केलेल्या अनेक पुरुषांची नांवें प्रसिद्ध आहेत. बसवय्या धन्नायक, मल्लापा बोडियार, माधव मंत्री, सायष्णा मंत्री,

केप मंत्री, दंडाधिपति गुड, बचाप्पा, मल्लीनाथ, तिमराज ऊर्फ तिमण्णा इत्यादि पुष्कळ नांवें जागजागीं दिलेलीं आहेत; पण त्यांचे खुलासेवार इतिवृत्त सांपडत नाहीं. विजयनगर शहर स्थापण्याची खटपट करणारा माधवाचार्य ऊर्फ विद्यारण्यस्वामी ह्याची मात्र थोडी बहुत हकीकत सांपडते. हा माधवाचार्य पूर्वी राजा संगमाजवळ होता. संगमाचा मुलगा हरिहर ह्याजकडून त्यानें विजय- नगरची स्थापना करविली. त्या कामी हरिहरास पैशाचे साह्यही माधवाचार्यांनें केलें. ह्यावरून त्या प्रांती आचार्याचें वजन अतोनात असले पाहिजे. भौगोलिक स्थितीवरून

२८८ / मुसलमानी रियासत : १

सुलतान घराणी

पाहतां, विजयनगरच्या स्थलाची जागा पसंत करण्यांत त्यानें अपूर्व योजकता दाखविली. शहरास इतकी उत्कृष्ट सोय बहुधा दुर्मिळ होय, असें तज्ज्ञ लोकांचें मत आहे. माधवानें अनेक हुशार गृहस्थांस स्वतः राजकीय धोरणें शिकवून हरिहराच्या नोकरींत ठेविलें. त्यानें अनेक कारस्थानें करून बुक्काची सत्ता वाढविली आणि त्यास विजय संपादन करून दिले, हा माधवाचार्य प्रथम शृंगेरी येथील शंकरा- चार्याच्या गादीवर होता, तेव्हां त्यास विद्यारण्यस्वामी हें नांव होतें. मुसलमानांकडून दक्षिणदेश जिंकला जाऊन शृंगेरीच्या मठाचा उच्छेद झाला, तेव्हां त्यांचा बंदोबस्त करण्याच्या हेतूनें नवीन हिंदुराज्य स्थापण्याची त्यानें खटपट केली. धर्म, नीति, तत्त्वशास्त्र, न्याय, व्याकरण, इत्यादि अनेक विषयांवर माधवाचार्यानं केलेले संस्कृत ग्रंथ, टोका व व्याख्यानें सर्वमान्य आहेत. माधवाचार्य नांवाचे दोन ग्रंथकार असावेत असा कित्येकांचा समज आहे, पण त्याचा निर्णय झालेला नाहीं. माधवचार्याचा भाऊ सायण्णाचार्य होय. त्यानें वेद व उपनिषद् यांजवर प्रचंड भाष्य लिहिलें आहे, त्यावरूनच वेदांचा अर्थ हल्लीं निधित होत असतो. सायण्णाचार्यही दुसऱ्या हरिहराच्या प्रधानकीचें काम पाहात होता.

एका विशिष्ट दृष्टीनं त्या दोघां पुरुषांची कर्तबगारी हिंदुस्थानच्या इतिहासांत विशेष स्मरणीय आहे. धर्म व राज्य ह्या दोन बाबतींची सांगड घालून आणि एकीचे साह्य दुसरीला घेऊन, मुसलमानांच्या वाढत्या शक्तीस आळा घालण्याचा जो हा प्रयत्न ह्या दोन पुरुषांनी विजयनगरास केला, त्यावरून ते राजकारण जाणणारे होते, असें दिसतें. मुसलमानांनीं धर्म व राज्य ह्या दोहोंचा मिलाफ करून आपली उन्नति कशी केली, आणि हिंदुस्थान काबीज करण्यास ते कसे समर्थ झाले हें ध्यानांत आणून तोच प्रकार त्यांनी आपल्या कर्तव्यांत स्वीकारिला. एका राजास हाताशीं धरून दक्षिण हिंदुस्थानांत मध्यवर्ती अशा मजबूद ठिकाणी त्यांनीं नवीन राज्यस्थापना केली आणि शृंगेरीच्या मठाचा त्यास पाठिंबा देऊन मुसलमानांस मागें हटविण्याचा उपक्रम केला, आद्य शंकराचार्यांचे मनांत हिंदु राज्य- स्थापनेची कल्पना असेल तर तिची खरी सांगता माधवाचार्यानें केली. युरोपांत तर राजकीय व धार्मिक सत्ता एकाच पुरुषाच्या हातांत असल्यामुळे तिकडच्या राष्ट्रांस आपली उन्नति करून घेतां आली. हिंदुस्थानांतही पूर्वी तसा प्रकार होता, पण पुढें तो बंद झाल्यावर पुनरपि तो निर्माण करून स्वराज्याची जी योजना माधवाचार्यानं केली, ती अत्यंत प्रशंसनीय होय.

**प्रवाश्यांच्या हकीकती, (सन १३४४-१४९०) —**

निकोलो कोंटी नांवाचा व्हेनिसचा एक गृहस्थ विजयनगरास आला होता. सन १४२० त व्हेनिस सोडून तो प्रवासास निघाला, तो हिंदुस्थानांत प्रथम खंबायतेस उतरला. तेथून कांहीं दिवसांनीं दक्षिण किनाऱ्यानें खालीं येऊन पुढें पायरस्त्यानें तीनशें मैलांचा प्रवास करून विजयनगरास गेला. तेथे कांहीं वर्षे राहून व आणखी दुसरीकडे प्रवास करून तो सन १४४४त परत व्हेनिसला गेला. त्यानें प्रत्यक्ष पाहिलेली विजयनगरची पहिल्या राजवंशांच्या वेळची हकीकत लिहून ठेविली आहे. तो लिहितो. 'विजयनगर एका उंच डोंगराच्या पायथ्याशीं आहे. शहराचा घेर साठ मैल आहे. तटांच्या भिंती पर्वतांच्या रांगांइतक्या उंच असून त्या सर्व दऱ्यांना वेष्ट्रन गेलेल्या आहेत. राज्यांत शहाण्णव हजार लोक लढाईच्या तयारीत आहेत. मोठमोठ्या लोकांचीं घरें व वाडे दगडी आहेत. शहरांत पाण्याचे कालवे आणिलेले असून, मोठमोठ्या बागा आहेत. ऊस व तांदूळ पुष्कळ पिकतो. जिकडे तिकडे सुंदर व विस्तीर्ण देवालयें असून, ब्राह्मणांच्या पाठशाळाही

पुष्कळ आहेत. वाडे, मंदिरें, तट, गोपुरें वगैरेंनी शहरास अवर्णनीय शोभा आली आहे. अनागोंदी व विजयनगर हीं नदीच्या दोन बाजूंचीं दोन शहरें मिळून एकच मोठें विस्तीर्ण शहर होतें, असें म्हटलें तरी हरकत नाहीं. शहराची दक्षिणोत्तर लांबी बारा मैल व पूर्वपश्चिम रुंदी सुमारें दहा मैल होती. त्या वेळचे कालवे अजून चालू आहेत; आणि त्यांच्या पाण्यावर बागाईत अद्यापि होत आहे. मध्यभागीं मुख्य राजवाड्याचे आवार होतें. निकोलो म्हणतो, 'येथील लोकांना पाहिजे तितक्या बायका करण्याची मुभा आहे. नवरा मेल्यावर त्या सर्व सती जातात. राजाजवळ नेहमीं बारा हजार बायका तयार असतात; त्यांपैकी चार हजार राजाबरोबर पायीं चालतात. चार हजार स्वयंपाक- खान्यांत असून, त्या घोड्यावर जातात; आणि दोन तीन हजार जनानखान्यांत असून, त्या पालखींतून फिरतात. दरसाल देवाची स्वारी शहरांतून मिरवते. शिवाय दुसरे सणवार पुष्कळ आहेत. विजयनगरच्या उत्तरेस पंधरा मैलांवर एक हिऱ्याची खाण आहे.' मार्को पोलोनें उल्लेख केलेल्या गोवळकोंड्याच्या खाणी त्या ह्याच होत. अब्दुर्रझाक नांवाचा इराणचा एक वकील सन १४४३ त विजयनगरास आला होता. इराणचा शहा शहारुख ह्यानें त्यास सन १४४१ त आपल्या नोकरीस ठेविलें; आणि कित्येक महत्त्वाच्या कामांसाठीं आपला वकील म्हणून विजयनगरास पाठविलें. त्यानें आपल्या प्रवासाचें दिनवृत्त लिहून ठेविलें असून, त्यांत त्या वेळच्या स्थितीचें उत्कृष्ट चित्र आहे. सन १४४२ च्या जानेवारींत तो हिरात सोडून निघाला; तेथून मस्कत येथे आला; तेथून जहाजानें कालिकोटास येऊन पुढें विजयनगरास गेला. त्यानें प्रत्यक्ष पाहिलेली हकीकत बरीच लिहून ठेविलेली आहे. त्याच्या लिहिण्याची शैली विशेष खुबीदार आहे. तो म्हणतो, 'रायाजवळ अकरा लाख फौज आहे; हिंदुस्थानांत इतका शक्तिमान् राजा दुसरा नाहीं. शहरांत जिकडे तिकडे गुलाबाचीं फुलें विक्रीस आहेत. व्यापाराच्या पेठा अनेक आहेत. हिरे, माणकें, पाचू, मोत्यें इत्यादि जवाहिरांच्या खरेदीविक्री करण्याच्याही पेठा आहेत. जिकडे तिकडे पाण्याचे पाट व कारंज्यांची मजा दिसते. तेथे महानवमीचा उत्सव होत असे, तो पाहण्यास अब्दुर्रझाक हजर होता. ह्या उत्सवाचे प्रसंगीं सगळे शहर इतकें गजबजून गेलें होतें कीं, त्याचा देखावा एखाद्या महासागरा- सारखा दिसत होता. एकंदरींत विजयनगरचें वैभव अप्रतिम होतें, ह्यांत संशय नाहीं.

फेरिस्ता म्हणतो, 'सन १३६६ त विजयनगरच्या रायांची सत्ता बहामनी सुलतानांपेक्षां फारच मोठी होती. सर्व दक्षिण हिंदुस्थान व ओरिसा सुद्धां पूर्व किनारा त्यांच्या ताब्यांत होता. गोवा वगैरे अनेक बंदरें त्यांच्या स्वाधीन होतीं. मंगलोर येथे त्यांचें एक मोठें आरमार होतें. सिलोन, तेनासरीम इत्यादि ठिकाणचे वकील मौल्यवान् नजराणे घेऊन रायांकडे येत असत.

**दक्षिणच्या मध्यकालीन इतिहासाचें पर्यालोचन -**

काळचा हा इतिहास आहे, त्या काळांत मुसलमान लोक हिंदूंचे देश एकामागून एक जिंकीत चालले होते. असें करण्यांत राज्यवृद्धि हा जरी त्यांचा उद्देश होता, तरी धर्मप्रसारानें त्यांना त्या कामीं विशेष उत्साह प्राप्त होत असे. अनेक हिंदु लोकांस त्यांनीं मुसलमान केलें आणि हिंदु स्त्रियांशीं लग्नें लाविलीं. असे प्रकार घडतांना बऱ्याच प्रसंगीं जरी जुलूम होत असे, तरी जुलमाशिवाय आपखुषीनेंही हिंदु- मुसलमानांमध्यें लग्नादि संबंध घडत असत. इतकेंच नव्हे, तर सोनाराची मुलगी निहाल हिनें विजयनगरच्या राजपुत्रास न व्ररितां शहाजादा इसनखान ह्यास वरिलें हैं वर सांगितलेंच आहे. अशीं उदाहरणें वारंवार घडत. इतिहासांत प्रसिद्ध झालेले पुष्कळ मुसलमान गृहस्थ हिंदु त्रियांच्या पोटी जन्मलेले होते. कित्येक तर मूळचे ब्राह्मण असून जबरदस्तीनें मुसलमान झाले होते. पुष्कळ मुसलमानांस हिंदु स्त्रियांचीच आवड विशेष असे. राज्यकर्त्यांचे जातभाई असल्यामुळे हिंदूंच्या सर्व वस्तीत मुसलमानांचा स्वैरसंचार चालू असे. हिंदु लोक परधर्मीयांस आपल्यांत घेत नसत, त्यामुळे वरच्याहून उलट प्रकार घडणें शक्य नव्हतें. तसा निबंध हिंदु धर्मात नसता, तर ज्याप्रमाणें इंग्लंडांत सॅक्सन व नॉर्मन ह्या दोन जातींचा शें-दोनों वर्षांत एकजीव झाला, तसा हिंदु-मुसलमानांचा येथेही झाला असता. सारांश, ह्या काळांत दोनही धर्मांचे लोक बहुतकरून व्यवहारांत अभेदानें वागत असत आणि उभयतांचें जें संघट्टण चालत आलें तें आजतागाईत कायम आहे. अनेक हिंदु गृहस्थ जुलमानें अगर स्वेच्छेनें मुसलमानी धर्म स्वीकारीत, आणि त्यायोगें पुढे ते मोठ्या लौकिकास चढत. मोठेपणा मिळविण्यास मुसलमान होणें हैं एक चांगलें साधन होतें. त्या काळीं प्रसिद्धीस आलेल्या मुसलमानांत अस्सल मुसलमान थोडेच असतील.

(२) दुसरी अशी एक गोष्ट दिसून येते की इराण, अरबस्तान, तुर्कस्तान वगैरे दूरदूरच्या देशांतून अनेक व्यापारी, कवी, सौदागर, साधू व इतर सामान्य लोक एकसारखे दक्षिणेत येत असत, त्यांस इकडे परदेशी म्हणत. अशा लोकांचा वर्ग इतका मोठा असे की दरबारांत पुष्कळ वेळां दक्षिणी लोकांस तो भारी होता. दक्षिणच्या राजांची कीर्ति दूरदूरच्या देशांत पसरली होती. तिकडच्या साधूस व कवींस इकडून बक्षिसें, नजराणे वगैरे पाठविण्यांत येत. हे लोक बहुशः जलमार्गानें दक्षिणेंत येऊन दाभोळ वगैरे बंदरों उतरत. हिंदुस्थानाशीं त्या देशांचा व्यापार फारच भरभराटीचा होता. सारांश, देशपर्यटन हें एक विद्येचें मुख्य अंग आहे असें आज समजण्यांत येतें, तसें त्या वेळेसही तें लोकांस वाटत असे. सर्व देशांतील बुद्धिमान् व साहसी लोकांस हा देश नांवलौकिक मिळविण्याचें एक उत्तम स्थळ झालें होतें.

(३) इराण, अरबस्तान वगैरे देशांच्या मार्गानें युरोपाशींही हिंदुस्थानाचे दळणवळण पुष्कळ चालत असे. तुर्कस्तान, रोम वगैरे राष्ट्रांतून कित्येक हुशार गृहस्थ मुद्दाम आणवून त्यांजकडून इकडचे राजे आपली फौज व तोफखाने तयार करवीत. हिंदुस्थानच्या वैभवाची खरी कल्पना युरोपियन लोकांस ह्या वेळेपासूनच होऊं लागली. पोर्तुगीझ लोकांनी हिंदुस्थानांत येऊन प्रबळ मुसलमान राष्ट्रांशीं टकरा मारिल्या, आणि अनेक वेळां त्यांजवर विजय संपादिले, ह्यावरून तीं मुसलमानी राज्ये बरीच दुर्बल होतीं असें म्हणावें लागतें.

(४) शिवाजीच्या पूर्वी दक्षिण हिंदुस्थानची स्थिति कशी होती, ह्याची कल्पना करण्यास हा मागचा इतिहास फार उपयोगाचा आहे. मराठ्यांस स्वतःचा अभिमान विशेष वाटत असे. आरंभी मुसलमानांनी त्यांस पुष्कळ जाच केला. त्यांच्या अफाट फौजांत लहानशी सुद्धां नोकरी मराठ्यांस मिळत नसे. ह्या अन्यायाचा मोबदला परत देण्याची मराठे वाटच पाहत होते. मुसलमानांशीं समोर लढण्याची जरी त्यांस आरंभी ताकद नव्हती, तरी त्यांना हार न जाणें व त्यांस आपली जरूर भासविणें, इतकीं कामें करून ते त्या वेळीं आपला बोज राखीत. अनेक नामांकित मराठे सरदारांची नांवें मागील इतिहासांत आलींच आहेत. ह्या मुद्द्याचें विशेष विवेचन मराठी रियासतींत आलें आहे तें पाहावें.

मुसलमानांस हार जावयाचें नाहीं ही बुद्धि दक्षिणेतील लोकांच्या अंगीं कायम होती. बहामनी राज्यांशीं व मुसलमानांच्या वाढत्या शक्तीशीं टक्कर मारण्याकरितांच विजयनगरचा उदय झाला. पुढे विजयनगरचा पाडाव झाला तरी लोकांच्या दृष्टी पुढचें तें उदाहरण मावळलें नाहीं. बहामनी राज्याच्या शाखांत तें दबून होतें, पण त्यांस योग्य संधि सांपडतांच्च शहाजी-शिवाजीच्या उद्योगानें तें पुनरपि उद्यास आलें.

(५) लोकांची राजकीय स्थिति हल्लींच्या स्थितीच्या मानानें समाधानकारक होती असें दिसत नाहीं. लोक आपले सार्वजनिक इक्क पाळण्याविषयीं दक्ष नसत; आणि राजे आपण होऊन त्यांस जसे वागवीत तसे ते वागवून घेत. गांवगन्ना रयतेस फारसा त्रास पोचत नसे. ग्रामसंस्थांची पद्धति सर्वत्र चालू असल्यामुळे लोकांस अमुक नवीन राजा झाला, किंवा अमुक मरण पावला ह्याची परवा वाटत नसे. राजघरण्यांतील क्रूर प्रकार व इतर बाबतींसंबंधानें, महाराष्ट्रांतील मुसलमानी शहांची स्थिति पूर्वी वर्णन केलेल्या दिल्लीदरबारच्या स्थितीहून फारशी भिन्न नव्हती. मराठ्यांच्या उदयासंबंधानें मात्र हा महाराष्ट्रांतील मुसलमानी राज्याचा इतिहास विशेष महत्त्वाचा आहे.

गुजराथ, महाराष्ट्र व दक्षिण हिंदुस्थान येथील स्वतंत्र राज्यांचे इतिहास जरा विस्तारानें दिले, ह्याचें कारण मराठी भाषेशीं ह्या प्रांतांचा विशेष संबंध आहे. चौदाव्या शतकांत मुसलमानांचीं स्वतंत्र राज्यें जशीं इकडे स्थापन झाली, तशींच तीं हिंदुस्थानच्या इतर प्रांतांतही झाली. त्यांचे कारणापुरते वृत्तान्त पुढील प्रकरणीं देण्यांत येत आहेत.

**सांस्कृतिक स्थिती:**

दक्षिण भारतातील विजयानगर हे चौदाव्या-सोळाव्या शतकांतील एक बलाढ्य व वैभवशाली साम्राज्य होते. त्याच्या राज्यविस्ताराबरोबरच सांस्कृतिक क्षेत्रातही-विशेषतः साहित्य, ललित कला, वास्तुकला, शिल्पकला, चित्रकला, संगीत इत्यादींमध्ये-लक्षणीय प्रगती झाली. सांप्रत या कलांचे अवशेष उपलब्ध असून त्यासंबंधी माहिती तत्कालीन परदेशी प्रवासी निकोलो दी काँती (इटालियन), डोमिंगो पायीश व फेर्नाओ नूनीश, बार्बोसा (पोर्तुगीज), अब्द-अल् रझाक (इराणी) इत्यादींच्या प्रवासवृत्तांतून मिळते. त्यांतून विजयानगर साम्राज्याची काही ठळक वैशिष्ट्ये लक्षात

येतात. विजयानगरचे राजे हिंदू होते मात्र त्यांना इतर धर्मांबद्दलही आदर होता, असे दिसते, परमत आणि परधर्म यांबाबत ते सहिष्णू होते. फिरिश्ताच्या म्हणण्याप्रमाणे दुसरा देवराय याने आपल्या सैन्यातील मुसलमानांची संख्या घेऊन त्यांना प्रार्थनेसाठी राजधानीत एक मशीद बांधून दिली होती. त्याच्या धर्मसहिष्णुतेबद्दल बार्बोसाने पुढील गौरवौद्गार काढल आहेत:''राजा ख्रिस्ती, ज्यू, मूर वा अन्यधर्मी अशा कोणत्याही जातिधर्मांच्या व्यक्तीस राजधानीत वास्तव्य करण्यास मुभा देत असे. अन्यधर्मियास कोणी कधी उपद्रव केल्याचे वा त्याची चौकशी झाल्याचे ऐकिवात नाही.''

विजयानगरचे राजे हिंदू संस्कृती व हिंदू धर्म यांचे संरक्षण करणे, हे आपले कर्तव्य मानीत. त्यांनी मुसलमानांच्या आक्रमणास दक्षिण भारतात पायबंद घातला. शिलालेखांत उल्लेखिल्याप्रमाणे त्यांनी 'पूर्वदमर्यादे'–म्हणजे परंपरागत रीतिरिवाज आणि सांस्कृतिक मूल्ये तसेच वर्णाश्रमधर्म-यांचे पालन केले. राजपदाबद्दल त्यांचे विचार उदात्त होते. 'धर्मावर लक्ष ठेवून राजाने राज्य करावे,' हे आमुक्तमाल्यदामधील कृष्णदेवरायाचे विधान विजयानगरच्या सर्व राजांना पुढे मार्गदर्शक ठरले. 'गोब्राम्हणप्रतिपालनाचार्य' या बिरुदावरूनही हिंदू संस्कृती व हिंदू धर्म यांबद्दल त्यांनी केलेल्या प्रसार-प्रचार कार्याची कल्पना येत.

विजयानगरचा राज्यांतर्गत तसेच परदेशांशी व्यापार होता. राजधानीत देशी-परदेशी लोक राहत होते. म्हणून बार्बोसा असे म्हणतो की, व्रजवैदुर्य, मोती, पाचू, पोळे, माणिक इ. मूल्यवान रत्नांच्या राशी रस्त्यावर भर बाजारात मांडलेल्या असत व त्या विकल्या जात.

**साहित्य:**

विजयानगक साम्राज्यात विविध व विपुल प्रमाणात साहित्यनिर्मीती झाली. कन्नड, तेलगू, संस्कृत या भाषांमध्ये विशेषेकरून लेखन झाले. शैव, वैष्णव, जैन या धर्म-पंथाचा प्रसार करण्यासाठी अनेक लिहिले गेल. इम्मडी प्रौढदेवराय, विरूपाक्ष साळुव नरसिंह, कृष्णदेवराय इ. राजांच्या काळात संस्कृत वाङ् मयाची-काव्य, नाटक, चंपू, तत्त्वज्ञान-निर्मिती झाली.

त्यापैकी माधवाचार्याचे नरकासुर
विजय व शंकरदिग्विजय दिवाकराचे पारिजातहरण, देवीस्तुती, रसमंजरि, भारतामृत विरूपाक्षरायाचे नारायण
विलाव उन्मत्तराषव कृष्णदेवरायाचे जांबवती-परिणय व उषा-परिणय इ. नाट्य-काव्यादी कृती संस्कृत साहित्यात विशेष उल्लेखनीय मानल्या जातात. यांशिवाय वेदार्थप्रकाश हे वेदांवरील भाष्य सायणाचार्या व माधवाचार्या यांनी राजनाथ डिंडिम, वेदांत देशिक, तिरूमलाबा, गंगादेवी, नाचन सोमाना, श्रीनाथ, पेद्दना (१४७५-१५३५), हरिदास, कुमारव्यास, चामरस, पुरंदरदास (सु. १४८४-सु. १५६४), कनकदास (१५०९- १६०७) इ. संतकवी, लेखक, भाष्यकार या काळात होऊन गेले आणि त्यांनी निरनिराळ्या भाषांतून साहित्यरचना केल्या. मधुराविजयम् किंवा कम्परायचरितम् हे गंगादेवीचे कम्परायाच्या मदुरा मोहिमेचे वर्णन आणि वरदाम्बिका-परिणय हे तिरूमलांबाचे अच्युतरायाबरोबरच्या प्रणयाचे तसेच विवाहाचे वर्णन ही काव्ये अनुक्रमे बीररस व शृंगाररस यांची धोतक आहेत. मनुचरितम्, वीरशैव वचनगळू या काही महत्त्वाच्या ग्रंथरचनांचा उल्लेख करता येईल. संगीत आणि कामशास्त्र यांवरही या काळात ग्रंथरचना झाली. प्रौढदेवरायाने कामशास्त्रावर रतिरत्नप्रदीपिका हा ग्रंथ लिहिला, तर इम्मडी देवरायाच्या पदरी असलेल्या कल्लिनाथ या संगीत तज्ज्ञाने कलानिधी या ग्रंथाची रचना केली. तेलुगू वाङ्मयाला कृष्णदेवरायाने उत्तेजन दिले.

**ललित कला:**

विजयानगराची राजसत्ता मुस्लिम आक्रमणाला थोपवून धरण्यात यशस्वी ठरली. परिणामी या साम्राज्य काळात हिंदू संस्कृतीचा सर्वांगीण विकास घडून आला. विजयानंतर साम्राज्याचा काळ भारतीय कलाचा उत्कर्ष काळ मानला जातो. वास्तुकला, मूर्तिशिल्पे, चित्रकला, संगीत, नृत्य आदी कलांची राजाश्रयाखाली भरभराट झाली.

**वास्तुकला:**

विजयानगर तुंगभद्रा नदीच्या दक्षिण काठावर वसले होते. त्यावेळी आशिया खंडातील प्रमुख नगरांत त्याची गणना होई. या नगराच्या वैभवाचे आणि तेथील भव्य वास्तूंचे वर्णन नूनीश, पायीश, रझाक, बार्बोसा इ. परकीय प्रवाशांनी नोंदवून ठेवले आहे. अब्द-अल् रझाकच्या मते विजयानगरचे क्षेत्रफळ ६४ चौ. मैल (सु. १६६ चौ. किमी.) असून त्याभोवती अंतराअंतरावर सात मजबूत तट होते. कडेच्या तीन तटांत शेती होती आणि आतील चार तटांत बालेकिल्ला, राजवाडे, मंदिरे, बाजार तसेच सरदार-उमरावांच्या हवेल्या व सामान्य जनांच्या वास्तू होत्या. पायीश म्हणतो, ''विजयानगर रोमाएवढे मोठे होते. तेथील राजप्रसादांनी लिखनच्या किल्ल्याएवढी जागा व्यापली होती. सुरेख उत्तुंग प्रवेशद्वारे, रूंद रस्ते, व्यापारी पेठा, मंदिरे, फळबागा, द्राक्षमळे यांमुळे शहरास शोभा प्राप्त झाली असून तेथे सर्व सुविधा उपलब्ध होत्या''. सांप्रत तेथील अवशेषांवरून विजयानगराच्या गतवैभवाची व भव्य वास्तूंची कल्पना येते.

'विजयानगर वास्तुशैली' या नावाने रूढ झालेली द्राविड वास्तुशैलीची एक उपशैली या काळात उदयास येऊन विकसित झाली. हिंदू वास्तुशैलीच्या मंदिर बांधणीचा हा अखेरचा आविष्कार होय. त्यानंतर मंदिर-वास्तुशैली जवळजवळ लोप पावलेली दिसते. विजयानगराच्या वास्तुशैलीचे लौकिक वास्तू व धीर्मिक वास्तू असे दोन ठळक प्रकार दिसून येतात. धार्मिक वास्तूमध्ये प्रामुख्याने मंदिर-वास्तू येतात तर लौकिक वास्तूंमध्ये प्रामुख्याने मंदिर राजवासे, मनोरे, सिंहासन, किल्ले इत्यादींचा अंतर्भाव होते. काही अवशिष्ट लौकिक वास्तूंत राजवाड्यांच्या जोत्यांशिवाय आणि सिंहासनाच्या दोन व्यासपीठांव्यतिरिक्त अन्य फार थोडे अवशेष आढळतात. तथापि त्यांतूनही त्यांच्या भव्यतेची कल्पना येते. यांतील राजदरबार-गृह मोठे असून त्यात सिंहासन आहे, अब्द-अल् रझाकच्या मते ही इमारत बालेकिल्ल्यातील सर्वांत उंची वास्तू होती. सिंहासनाच्या बाजूंवर अलंकृत मूर्तिकाम आहे, तसेच प्रवेशद्वारावर आणि सिंहासनाच्या मार्गावरील भिंतीवर मूर्तिकाम आढळते. पडझडीमुळे या वास्तुंची रचना नेमकी कशी होती, याची पूर्ण कल्पना येत नाही. या इमारतींच्या जवळच कमल महाल, हत्तींच्या पागा, जनानखान्याजवळील मनोरे इत्यादींचे अवशेष आहेत. विजयानगराच्या राजांच्या काही किल्ले बांधले त्यांपैकी बेल्लोर व शिवगंगा हे दोन दुर्ग लक्षणीय आहेत. लौकिक वास्तुकलेत इस्लामी पद्धतीच्या कमानी व मूळच्या स्थानिक वास्तुकलेचे पारंपारिक सज्जे यांचे समतोल मिश्रण आढळते.

विजयानगर मंदिर वास्तुशैलीचे विपुल नमुने आंध्र प्रदेश, तमिळनाडू, कर्नाटक आदी दक्षिणेकडील राज्यांत आढळतात. हिंदू स्थापत्यशैलीचा हा पुनरूज्जीवनाचा काल मानण्यात येतो. तत्कालीन शिलालेखांवरून मूळ द्राविड वास्तुविधानाचा पुनराविष्कार झाल्याचे दिसून येते. मूळ द्राविड वास्तुविधानाचा पुनराविष्कार झाल्याचे दिसून येते. गर्भगृह, मुखमंडप, अर्धमंडप, महामंडप, विमान इ. वास्तुघटक मंदिराच्या आकारमानानुसार असुन त्यांत कल्पाणमंडप व अम्मान मंदिर (गृह) या दोन वास्तुविशेषांची भर या काळात पडली. अम्मान मंदिर ही मूळ मंदिराची पूरक लहान प्रतिकृत मूळ देवाच्या पत्नीसाठी उभारण्यासाठी उभारण्यात आला. तेथे लोकांच्या दर्शनार्थ प्रसंगोपात्त देवतेच्या प्रत्यमा ठेवत. याशिवाय या काळात दगडी रथाची रचना हा देखील मंदिर वास्तुशैलीचा एक महत्त्वाचा घटक बनला.

विजयानगर वास्तुशैलीचे प्रातिनिधिक नमुने खुद्द विजयानगर राजधानीत तसेच ताडपत्री, कांचीपुरम्, तिरूवल्लूर, श्रीरंगम्, चिदंबरम्, रामेश्वरम्, मदुराई, तिरूनेलवेली इ. ठिकाणी पाहावयास मिळतात. विजयानगरचे सम्राट, नायकराजे व सेतुपर्तीसारखी लहान धराणी यांनी मंदिरे बांधून घेतली. यांतील विजयानगर आणि ताडपत्री येथील मंदिरे स्वरूप दृष्ट्या काहीशी निराळी आहेत इतरत्र मात्र त्यांचा घाट एकाच प्रकारचा आढळतो. विजयानगर येथील पंपापती, विठ्ठलस्वामी आणि हजार राम ही अवशिष्टस मंदिरे सोळाव्या शतकात कृष्णदेवरायाने बांधली. त्यांपैकी विठ्ठलस्वामी आणि हजार राम ही एकाच समविधानाची आणि समलंकृत आहेत मात्र हजार राम हे मंदिर लहान असून त्यात गर्भगृह आणि मंडप ही दालने जोडलेली आहेत व अम्मान मंदिर स्वतंत्र आहे. पूर्वेकडील गोपुरातून प्रवेशद्वार आहे. ते राजप्रसादाजवळ असल्यामुळे राजघराण्यातील स्त्री-पुरूषांचे ते नियमित दर्शनाचे स्थान असावे. शिखर विटा व चुना यांचे असून त्यावर चुनेगच्चीत मूर्तिकाम आहे. विठ्ठलस्वामी मंदिर पूर्वाभिमुख असून हजार राम मंदिरापेक्षा आकाराने तिप्पट मोठे असून त्याचे बांधकाम पुढे अच्युतरायाच्या कारकिर्दीतही चालू होते. मंदिराच्या पूर्वेस, दक्षिणेस व उत्तरेस भव्य गोपुरे आहेत. मूळ मंदिर तीन प्रमुख दालनांत विभागलेले असून उघडा मंडप भिन्न प्रकारच्या अलंकृत

स्तंभांनी व्यापला आहे. तुळया, छत, देवळया, छज्जे इत्यादींवर कलाकुसरयुक्त केरीवकाम आहे. अम्मान मंदिर, कल्याणमंडप, अलंकृत दगडी रथ या सर्व रचनांसाठी परिणत अवस्था येथे दृग्गोचर होते. द्राविड मंदिरशैलीची सर्व वास्तुवैशिष्ट्ये विठ्ठलस्वामी मंदिरात प्रकर्षने दिसून येतात.

ताडपत्री येथील मोडकळीस आलेले मंदिर कृष्णदेवरायाच्या प्रांताधिपतीने बांधले. या मंदिरातील दोन गोपुरांची रचना विठ्ठलस्वामी मंदिरातील गोपुरांपेक्षा सरस व आकर्षक आहे. या गोपुरांचा खालचा भाग अनलंकृत आहे पण वरच्या भागावर विपुल शिल्पांकन आहे. पार्वती मंदिर (चिदंबरम्), वरदराजस्वामी आणि एकाम्रनाथ (कांचीपुरम्), जंबुकेश्वर (तिरूचिरापल्ली), मार्गाशेखेश्वर (विरंजिपुरम्)इ. मंदिरे सुस्थितीत आहेत. या सर्व मंदिरांतील मंदपांत पार्वती मंदिरातील मंडप हा विजयानगर वास्तुशैलीच्या प्रथमावस्थेतील, तर वेल्लोर किल्ल्यातील कल्याणमंडप हा या शैलीची परिणत अवस्था दर्शवितो. या मंडपातील मेहरपीनधील स्तंभांवरील कोरीवकाम गुंतागुंतीचे असेल, तरी त्यातील सूक्ष्म तपशील कारागिरांचे कौशल्य दर्शवितात. मेहरपीमधील स्तंभ हे रूपक पुढे द्रविड शैलीचा एक गुणविशेष बनले. या स्तंभावर अश्वारूढ भव्य पुतळे आणि भिन्न भव्य व्याल–मूर्ती खोदलेल्या आहेत.

उंच आणि भरभक्कम गोपुर हे या वास्तुशैलीचे आणखी एक वैशिष्ट्य होय. मंदिरप्राकारांच्या भव्य अलंकृत प्रवेशद्वारांना ही संज्ञा रूढ झाली. मंदिराच्या शिखरापेक्षा गोपुराची उंची अधिक ठेवण्याचा संकेत होता आणि त्याचे वास्तुविज्ञान आयताकार असे. प्राकाराला समांतर अशी त्याची रचना असून मध्ये प्रवेशद्वारा असे. मंदिराभोवती तट (आवरणे) घालण्याची पद्धत या काळात रूढ झाली. या तटाच्या आतील बाजूस उघड्या खांबांवर आधारलेल्या ओवऱ्या असत आणि साधारणतः पूर्व, दक्षिण व उत्तर या दिशांना तोंड करून ही गोपूरे बांधीत. प्राकारात सहस्रस्तंभी मंडप (उदा., वरदरा जस्वामी मंदिर), कुंडे, अम्मान मंदिर व इतर देवतांची छोटी मंदिरे असत. मंदिरापासून प्राकाराचे अंतर जितके जास्त, त्या प्रमाणात गोपुरांचा आकार वाढत जाई. श्रीरंगम् येथील विष्णुमंदिर अशा प्रकारच्या वास्तुविशेषाचा प्रातिनिधिक नमुना होय. मुख्य विष्णुमंदिर लहान असून अनाकर्षक आहे पण सभोवतालच्या सात तटांमुळे तेशील गोपुरांची संख्या (चौदा) आणि आकार वाढला आहे. दगडी तळमजल्यावर लहान मजले विटा व चुना यांत बांधून ते मूर्तिसिल्पे व अन्य अलंकरणात्मक ज्ञापके यांनी सुशोभित केलेले आहेत. यांवरील मूर्तिकाम चुनेगच्चीत केलेले असून ते चित्रविचित्रपणे रंगविलेले दिसते. सर्वात वरच्या मजल्यावर गजपृष्ठाकार छप्पर आणि त्यावर स्तुपी (कळस) आढशतो. मजल्यांवर भिंतींभोवती कूट (चौरस) आणि शाला (आयत) या वास्तूंच्या छोट्या प्रतिकृति असून त्यांत देवदेवतांच्या मूर्ती बसविलेल्या आहेत. विमान व शिखर यांच्यावर सजावटीसाठी बारीक नक्षीकाम केलेले सर्वत्र आढळते. दक्षिण भारतातील या गोपुरांत कांचीपुरम् येथील एकाम्रनाथ मंदिरातील गोपुर भव्य व वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्याचे बांधकाम कृष्णदेवरायाच्या कारकीर्दीत झाले. त्याची उंची सु. ५७ मी. असून त्यात एकूण दहा मजले आहेत. येथील मूर्तिकाम गोपुराच्या भव्यतेला साजेसे आहे. मदुराई येथील मीनाक्षी मंदिरातील तिरूमल नायक यांने बांधलेले गोपूर अंतर्वक्र आहे. त्यामुळे ते गतिमान दिसते. ताडपत्री येथील गोपुरही सुंदर व अलंकरणसमृद्ध आहे.

विजयानगर मंदिरशैलीची सर्व वास्तुवैशिष्ट्ये हंपी येथील मंदिरसमूहातून दिसून येतात. पीठावरील थर येथे ठळक आहेत. भिंतींना फारशी मोडणी नाही अर्धस्तंभांनी काही ठिकाणी भिंत विभागली असून मधल्या बागात देवगोस्ट आणि गोस्टपांज्जर ही रूपके वापरली आहेत. विमानांची रचना मजल्यांची असून त्यांवर कूटशाला यांच्या हारांची योजना केलेली आहे. एकूण विजयानगरची मंदिर-वास्तुशैली निर्विवाद भव्य आणि दिमाखदार आहे. तिच्या सुशोभनात आलंकारित रूपकांची विपुलता आणि सौंदर्य आहेय त्याची प्रचीती वैविध्यपूर्ण रेलचेल आणि कलाकुसरयुक्त सुबक स्तंबरचनेतून येते तथापि तपशिलांची रेलचेल आणि गुंतागुंत यांमुळे पुष्कळ अशी ती गोंधळात टाकणारी झाली आहे तरीसुद्धा वास्तुकाराने अलंकरण आणि वास्तूचा घाट यांत कौशल्यपूर्ण समतोल साधण्याचा प्रयत्न केला आहे.

**शिल्पकला:**

विजयानगरच्या सुरुवातीच्या काही शिल्पांवर चालुक्य शैलीचा प्रभाव दिसतो. पुढे मात्र या मंदिरशैलीत–गोपुर, मंडप, विमान याच्या बांधणीत-याशैलीचे वास्तुविशेष प्रकर्षाने आढळतात. या काळात भव्य मूर्ती खोदण्याची प्रवृत्ती

वाढली. त्यापैकी हंपी येथील स्वतंत्र मूर्तीत नरसिंह (६.७० मी. उंची) आणि गणेश या मूर्ती प्रसिद्ध आहेत. नरसिंहाच्या मूर्तीखाली शिलालेख असून ती १५२८ मध्ये कृष्णदेवरायाने एकसंध दगडात खोदून घेतली. तिरूपतीपरिसरातील चक्रतीर्थ सरोवराजवळची एकसंध पाषाणातील रंगनाथ, चक्रपुरुष, पांडुरंग यांच्या कलात्मक मुर्ती तसेच द्वारपाल आणि इतर सेवकांच्या एकसंध पाषाणातील अनेक प्रतिमा प्रसिद्ध आहेत. विजयानगरच्या सुरुवातीच्या काळातील काही सुरेख शिल्पाकृती ताडपत्री येथील रामस्वामी मंदिराच्या गोपुरांवर आढळतात. येथील द्वारशाखेतील मकरावर उभी असलेली गंगादेवीची उत्थित शिल्पाकृती गतिमानता आणि प्रमाणबद्धता यांमुळे आकर्षक वाटते. विष्णुमंदिर (पेनुकोंडे) आणि हजार राम मंदिर (हंपी) येथील मंदिरांवर रामायणातील कथा आणि कृष्णाच्या बाललीला यांचे शिल्पांकन आहे. किंबहुना रामायण आणि भागवत या ग्रंथांतील विषय तत्कालीन शिल्पकारांच्या आवडीचे होते. त्याचप्रमाणे काही शैव संतांच्या कथांचेही शिल्पांकन पेनुकोंडे येथील मंदिरात आढळते. विजयानगरकालीन स्तंभ वैविध्यपूर्ण असून स्तंभांवरही विपुल कोरीवकाम आहे. चार, सहा असे स्तंभ एकमेकांशेजारी एकमेकांना जोडून कमानीमधील मोठा स्तंभ तयार होतो. यांना जोडून व्याल, घोडेस्वार, देवदेवता, सुरसुंदरी, शालभंजिका अशा विविध मूर्तीचे समूह कोरलेले दिसतात. श्रीरंगम् (तिरुचिरापल्ली) मंदिराच्या मंडपातील स्तंभांवर पत्रपट्ट, रत्नपट्ट इ. कोरीवकाम आहे. चौथऱ्यावर पूर्माकारात व्याल, शालमंजिका, नर्तक-नर्तकी यांच्या मूर्ती आहेत.

हंपी येथील मंडपांच्या पीठावर कोरीव शिल्पपट्ट असून त्यात अश्रावरूढ सैनिक, हत्तींची मिरवणूक, नृत्यांगना, गायक-वादकांचा जथ्था आणि कोलाट्टम् हे लोकनृत्य दाखविले आहे. विजयानगरचा शिल्पकार हा एकसंघ दगडात रथाचे शिल्प खोदण्यात विलक्षण कुशल होता. ताडपत्री आणि हंपी येथील रथ हे याचे उत्कृष्ट नमुने होत. दक्षिण भारतातील काष्ठ-रथशिल्पाचे रूपकच येथे दगडात वापरलेले दिसते. लेपाक्षी मंदिरातील नाट्यमंडपातील अप्सरा, गायक-वादकवृंद आणि नटराज यांच्या शिल्पांतून तत्कालीन कलेचे वैभव व भव्यता दिसून येते. वेल्लोरच्या किल्ल्यातील कल्याणमंडपातील स्तंभांवरही अश्वारूढ प्रतिमा व अन्य मूर्ती कोरलेल्या आहेत. पुढचे पाय वर उचलून घेतलेल्या घोड्यांच्या व त्यांवरील स्वारांच्या प्रचंड मूर्तीत वीररसीचा आवेश दिसतो, तर खालच्या बाजूस स्वारांचे सहकारी आहेत. सैनिकांच्या हातांतील तलवारी, उधळलेल्या घोड्याचा लगाम, लगामाने रुंदावलेले ओठ आणि खोगिरीवरील बारीक कलाकुसर यांतुन वास्तव चित्रणाचा प्रत्यय येतो तसेच मूर्तीतील गतिमानता आणि भव्यता दृग्गोचर होते. मंडपाच्या छतावरील दोन पायांवर उभे राहिलेले सिंह, घोडे माकडे आणि कबुतरे यांची शिल्पे जिवंत वाटतात. अशाच प्रकारची परंतु आधिक गुंतागुंतीची शिल्पे नंतरच्या वरदराजस्वामी, रंगनाथ (श्रीरंगम्), मार्गशेखेश्वर व इतर स्थळी असलेल्या मंदिरांतून आढळतात. विजयानगरच्या राजांनी शिल्पकारांकडून आपली व्यक्तिशिल्पेही खोदून घेतली आणि ती आपल्या आराध्य देवतांच्या सान्निध्यात ठेवली. कृष्णदेवरायाचे एक व्यक्तिशिल्प चिदंबरमच्या एका गोपुरात पहावयास मिळते. त्याची तुलना त्याच्या धातूच्या प्रतिमेबरोबर केली असता तीत विलक्षण साम्य आढळते. तिरुक्कोयिलूर येथील कंकाळ मूर्ती, तंजावर जिल्ह्यातील बाल सुब्रह्मण्यमची मूर्ती किंवा त्याच जिल्ह्यातील धर्मपूर मठातील वृषभवाहन मूर्ती या अतिशय रेखीव व सौंदर्यपूर्ण धातुमूर्ती आहेत. यांशिवाय अनेक देवदेवतांच्या मूर्ती येथे मिळाल्या आहेत. वेंकटपतिरायाची एक धातुमूर्ती उपलब्ध झाली आहे.कृष्णदेवराय आणि त्याच्या राण्यांचे एक धातुशिल्प प्रसिद्ध असून कृष्ण देवरायाच्या व्यक्तीशिल्पांमधे त्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. काही मूर्ती मिश्रधातूंमध्ये बनविलेल्या आढळल्या आहेत. प्रारंभीच्या मूर्तीमध्ये अप्रमाणशीर उंची व कृशता प्रकर्षाने जाणवतात. अगदी लहान मुलाचा चेहरासुद्घा प्रौढत्व दर्शवितो. तसेच आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे वाकदार चोचीसारखी नाके लक्ष वेधून घेतात. तंजावर येथील पार्वतीची मूर्ती या दृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण मानावी लागेल. नायक काळात ही प्रवृत्ती वाढली. मदुराई येथील दीपलक्ष्मी कमरेत वाफलेली पण उभे राहण्यात त्रिभंग मूर्तीचे लालित्य नाही.विजयानगरच्या कलाकारांनी काही हस्तिदंती मूर्ती घडविल्या. त्यांतील काही नाजूक व कलाकुसरयुक्त आहेत. तिरूमल नायकाच्या काही हस्तिदंती प्रतिमा श्रीरंगम् मंदिरातील वस्तुसंग्रहालयात आहेत. विजयानगरचे शिल्पकाम भव्य आणि ठाशीव असले, तरी बाह्य व अंतर्भागातील एकूण मूर्तीचा विचार केला असता, त्यात एकजिनसीपणा आढळत नाही. मूर्ती आणि वास्तू वेगळ्या घाटतात. मूर्तीचा केवळ एक परंपरीगत रूपक म्हणून येथे उपयोग केला आहे.

**चित्रकला, संगीत व नृत्य :**

विजयानगरच्या चित्रकलेविषयीचे, विशेषतः भित्तिचित्रांचे नमुने मंदिर, राजप्रासाद, मठ, वाडे यांतून उपलब्ध झाले आहेत, पायीश याने विजयानगरच्या चित्रकलेविषयी लिहून ठेवले असून कृष्णदेवरायाच्या महालातील चित्रांचा आवर्जून उल्लेख केला आहे. या काळात मंदिरे रंगविण्यात येत. खुद्द विजयानगरमधील विरूपाक्ष मंदिरातील सभामंडपाच्या मिरवणुकीचा देखावा चितारलेला आहे. अनेगुंदीमध्ये उचमप्प मठाच्या छतावर विविध प्रकारचे भौमितिक आकृतिबंध वेलबुट्ट्या चितारलेल्या आहेत. येथील स्त्री-प्रतिमांतून तत्कालीन दागदागिने व पोषाखाची कल्पना येते. अनेगुंदी व लेपाक्षी या दोन ठिकाणी या काळातील चित्रकाम आहे. यातील लेपाक्षी मंदिरातील, मनुनीतिकुंद या राजाला आर्शीवाद देण्याच्या आविर्भावातील गंगाधर शिव व चन्देश सेवक इ. दृश्ये लक्षणीय आहोत. हे मंदिर वीरभद्र या देवतेचे असल्यामुळे येथील भित्तिचित्रांत शिवीच्या विविध रूपांचे चित्रण आहे. हंपी येथील त्रिपुरांतक कथा आणि द्रौपदी स्वयंवर ही दृश्ये विजयानगर चित्राशैलीची उत्कृष्ट उदाहरणे होत. नायक राजांनी ही भित्तिचित्र परंपरा पुढे चालू ठेवली. तिरूवल्लूर येथील मुचकुदाची कथा, भिक्षाटन शिव आणि मोहिनी यांच्या कथातून ती दृग्गोचर होते. पापमाशेश्वर मंदिराच्या छतावर चित्रकाम असून त्यात महाभारत आणि विविध पुराणे यांतील प्रासंगिक कथांचे चित्रीकरण आहे. अर्धमंडपात शिवतांडव, दक्षिणमूर्ती, गंगाधर तसेच हरिहर यांच्या चित्रप्रतिमा शिल्पशास्त्राच्या संकेतानुसार बनविलेल्या आहेत. ही भित्तिचित्रे विजयानगरची प्रातिनिधिक चित्रे होत. अशाच प्रकारची भित्तिचित्रे चिदंबरम् येथील शिवकामसुंदरी मंदिरात क्रमशः चितारलेली आहेत. तिरूवलंजुळी (जि. तंजावर) येथील कपर्दिश्वर नटराज शिव आणि त्याचे नृत्यमग्न गण आढळतात. भित्तिचित्रांत समुद्रमंथन, कामदेवाचा नाश, नल-दमयंती विवाह, दशावतार, कृष्णालीला आदी पौराणिक विषय सामान्यतः हाताळलेले दिसतात तसेच हत्ती उंट व इतर प्राणाही चितारलेले आहेत. चित्रात उपलेपनावर प्रथम तांबड्या रंगाने बाह्यकृती रेखाटीत, नंतर त्यांत अगदी भडक छटांचे लाल, पिवळे व निळे रंग भरीत. शेवटी ठळक काळ्या रंगाने बाह्याकृती पुन्हा गिरवण्यात येई. मानवी आकृती दाखविण्यावर विशेष भर होता.

वास्तु–शिल्प–चित्रादी कलांबरोबर संगीत–नृत्यादी कलांना विजयानगरच्या सम्राटांनी प्रोत्साहन दिले. या काळात शास्रोक्त संगीतावर ग्रंथ टीकाटिपण्णी लिहिल्या गेला. इम्मडी देवरायाच्या आज्ञेवरून कल्लिनाथ याने शारंदेवाच्या संगीतरत्नाकर या ग्रथांवर टीका लिहीली. कर्नाटक शैलीची अभिवृद्धी याच काळात झाली धृपद व ख्याल या गायनप्रकारांचा प्रसार झाला. कल्लिनाथाचा नातू पं रामामात्य याने स्वरभेलकलानिधी (सु. १५३०) हा ग्रंथ लिहिला. श्रीपादस्वामींनी शेकडो छंदाची रचना केली. संगीतातील थाटपद्घतीचा आरंभ विजयानगर दरबारात प्रथम झाला. राजदरबारात समारंभप्रसंगी नृत्य-संगीताचे कार्यक्रम होत. विजयानगरच्या शिलालेखांत ढोल, भेरी, मंजीर इ. वाद्यसामग्रीचे उल्लेख येतात. राघवेंद्र-विजयम् मध्ये कृष्णदेवराय स्वतः वीणा वाजवीत असल्याचे वर्णन आढळते.याशिवाय शिल्पांत नृत्यांच्या अनेक मुद्रा आढळतात.

## बहामनी राज्य

**हिंदु व मुसलमान ह्यांचे दक्षिणेंतील कलह-**

दक्षिण हिंदुस्थानांत मुसलमान सत्तेची स्थापना झाली, तिची हकीकत वाचली म्हणजे हिंदु व मुसलमान ह्यांजमधील विरोध चांगला कळून येतो. मुसलमानांची सत्ता पंजाब व दिल्ली त्या प्रांतांच्या पुढे पसरली नव्हती, तोपर्यंत त्यांच्यांत प्रखर व कडव्या मुसलमानांची मध्यआशिया खंडांतून भरती होऊन, त्यांचा अस्सल बाणा जागृत राहत होता. हिंदु लोकांशीं त्यांचा संबंध फारसा आला नव्हता. दिल्लीच्या दरबारी हिंदूंचें बजन नसून हिंदु स्त्रियांशी लग्न करणें मुसलमानांस प्रशस्त वाटत नव्हतें. परंतु दक्षिणेत त्यांचा प्रवेश होऊं लागला, तेव्हांपासून त्यांच्या धर्माचे व

राज्यकारभाराचे स्वरूप बदलत चाललें. अपरिचित देश व भिन्न भाषा ह्यांत त्यांस वावरावयाचे असल्यामुळे उत्तरेकडील मुसलमानांचे व त्यांचें मूळचे नातें तुटत चाललें. हिंदूंचे आचारविचार त्यांस ग्राह्य करावे लागले. हिंदु स्त्रियांशी त्यांनी लग्ने लाविलीं. अर्थात् हिंदूंच्या राहणीचा परिणाम त्यांजवर होऊ लागला. त्यामुळें दिल्लीच्या सुलतानांच्या ताब्यांत राहणें त्यांस दु:सह वाटून त्यांतून आपली मुक्तता करून घेण्यास ते उत्सुक झाले, ही वस्तुस्थिति दिल्लीदरबारनें समजून घेतली नाहीं. दक्षिणेतील ह्या भेदबुद्धीचा संपर्क दिल्लीसही पोंचला; पण तेथील करड्या मुसलमानी फौजेपुढे त्या संपर्काचे वजन पडलें नाहीं. तेर्णेकरून दिल्लीचे सुलतान दक्षिणदेशास मुकले. मुसलमानी धर्माचा औत्तरीय प्रवाह हिंदुधर्मरूपी दक्षिणमहासागरांत घुसतांना त्यास अडथळा शाल्यामुळे संगमाच्या ठिकाणीं ह्या नवीन प्रवाहांतील गाळ सांचून मूळ जमिनीपासून हा भाग अलग झाला. ह्या गोष्टीबद्दल आगाऊ इशारा मिळाला नव्हता असें नाहीं. सन १३२० सालीं खुाच्या वेळेस दिल्ली शहरांत जें बैड झालें तें ह्या भावी परिणामांचें सूचक होतें. तथापि हा इशारा त्या राज्यकर्त्यांनीं जुमानिला नाहीं. महंमद तुलखचा जुलूम व दररोज सुटणारे त्याचे नवीन हुकूम ह्यांच्या योगानें सन १३२० पासून धुमसत असलेल्या असंतोषांत भर पडून, त्याचा स्फोट सन १३४७ त झाला. या दोन बंडांची हकीगत एकदम ध्यानांत घेतली पाहिजे.

सन १३२० सालीं दिल्ली शहरांत जें हिंदूचें बंड झालें, त्यांत दक्षिणेतील राजांचें. अंग होतें. दिल्लीत बंड झाल्याबरोबर दक्षिणच्या राजांनीं उचल घेतली ग्यासुद्दीन तुघ्लखनें दिल्लीचा बंदोबस्त केल्यावर आपला मुलगा जो महंमद तुघ्लख म्हणून पुढें प्रसिद्धीस आला, त्यास दक्षिणच्या बंदोबस्तास पाठविलें. त्यानें देवगडचा बंदोबस्त केला; परंतु वरंगळचे राजाकडून पराभव पावून त्यास जीव घेऊन देवगडास परत यावें लागलें. कारण वरंगळास शहाजादा पोचल्यावर त्यास एक महिनाभर दिल्लीचें वर्तमान कांहींच समजलें नाहीं. तेव्हां तिकडे सुलतान मेल्याची बातमी उठली. त्याबरोबर मोगल फौजेची पुनः कत्तल होणार असें फौजेंत कळलें. शहाजाद्याबरोबर बरीच फौज मोगल होती. तींतील लोक घाबरून त्यास सोडून गेले. कित्येक हरामखोर फितुर होऊन हिंदु फौजेस जाऊन मिळाले. वरंगळच्या राजानें शहाजाद्याचा निकट पाठलाग केला. पुढे शहाजाद्यानें मुसलमानांची एक नवीन फौज तयार करून वरंगळचा पाडाव केला हें मागें आलेंच आहे.

ह्या गोष्टीस पंचवीस वर्षे लोटलीं, दक्षिणेतील बंड मोडलें, तरी त्याचे निर्मूलन झाले नव्हतें. अर्थात् अनुकूल संधि येतांच, त्याचा पुनरपि उद्भव झाला. बंड केल्याबद्दल आपल्या वडिलांस पूर्वी काय शिक्षा भोगाव्या लागल्या हैं त्यांची मुलें विसरून गेलीं, पुनः त्यांचे मनांत बंड करण्याची प्रेरणा झाली. सन १३४७ सालांत तोच प्रकार घडला. मुसलमानी लष्करास महंमदाची भीति पडली. हिंदु राजांस आपले स्वातंत्र्य परत मिळविण्याची संधि प्राप्त झाली. लष्करानें बंड केले व त्यास तेथच्या राजांनी मदत केली. लष्कराच्या लोकांनी आपल्या अधिकाऱ्यांस ठार मारून सरकारी तिजोऱ्या लुटल्या. महंमद तुघ्लखाच्यानें ह्या बंडाचा मोड करवेना. अर्थात् हसनगंगू नांवाच्या गृहस्थास दक्षिणेंत मुसलमानांचं नवीन राज्य स्थापितां आलें. अशा प्रकारचीं बंडें दक्षिणेंतच झालीं असें नाहीं. बंगाल्याकडे गेलेल्या मुसलमानांनी हिंदूंच्या मसलतीनें स्वतंत्र राज्य स्थापण्याचे प्रयत्न केले. परंतु बंगाल्यांत हिंदु लोकांनीं बंडखोरांस मदत दिली नाहीं. दक्षिणचे हिंदु पाणीदार होते. त्यांस स्वातंत्र्याची अभिरुचि विशेष होती. बंगालचे हिंदु मुसलमानांस वचकून असत. स्वधर्माचं वारें त्यांच्यांत प्रखरपणे खेळत नसल्यामुळे महाराष्ट्रा प्रमाणे त्यांच्यांत स्फोट झाला नाहीं.

**दक्षिणेतील बंडाचें अंतस्थ कारण –**

शिया व सुनी ह्यांजमधील विरोध हेंच ह्या बंडाचें अंतस्थ कारण होय. शिया व सुनी ह्यांजमधील मत- भेद मागे सांगण्यांत आलाच आहे. हिंदुस्थानांत ह्या मतभेदास चमत्कारिक स्वरूप प्राप्त झालें. सुनी पंथाचा हिंदु धमाशीं अत्यंत विरोध आहे. शिया पंथाचा कल हिंदुधर्माशीं कांहीं अंशीं तरी मिळता आहे. एवढा भेद लक्षांत ठेविला म्हणजे ह्या वेळच्या मुसलमानी इतिहासाचे स्वरूप विशेष स्पष्ट होतें. सुनी लोक मदिना येथील धर्मसभेनें निवडिलेल्या पहिल्या चार खलीफांस मानितात, महंमदाच्याच वंशजांत दैविक अंश आहे असें त्यांस वाटत नाहीं. हिंदुधर्म म्हणजे निव्वळ मूर्तिपूजा असें ते मानितात, शियापंथी मुसलमानांचा कल वेगळा आहे. ते पहिल्या चार खलीफांस मानीत नाहींत. ते जास्त देवभोळे व आग्रही आहेत. महंमदाच्या औरस वंशास सय्यद असें म्हणतात. सय्यदांच्या शरीरांतील धमन्यांतून महंमद पैगंबराचें

शुद्ध रक्त अद्यापि खेळत आहे असें शिया मुसलमान समजतात. त्यांचीं धर्मसंबंधीं व इतर मतें हिंदूंच्या मतांशीं बरीच मिळतीं आहेत. आरंभी मोहरमचे पहिले पंधरा दिवस सर्व मुसलमानांत मोठे सणाचे होते. पण त्या महिन्याच्या दहाव्या दिवशीं हुसेनाचा खून झाल्यामुळे, हिंदूंच्या मूर्तिपूजेच्या धर्तीवर मुसलमान ताबुतांपुढें हुसेनाचें भजन करितात. ही एक प्रकारची मूर्तिपूजाच होय. दक्षिणेतील मुसलमानी राज्यांशीं शिया पंथाचा निकट संबंध आहे. आरंभीं दक्षिणेत आलेले मुसलमान सुनी होते. दक्षिणेत जन्मलेले लोकही सुनीच म्हणून सुनीपंथी लोकांस बहामनी राज्याचे वेळेस दक्षणी असें नांव मिळाले. पण लष्करांत मोगलांचा भरणा विशेष असे. हे मोगल बहुशः शियापंथीच असत. त्यांचा भरणा बहामनी राज्यांत विशेष होता. हे बाहेरून आलेले असल्यामुळे त्यांस परदेशी असें नांव प्राप्त होऊन, त्या दोन पक्षांचे तंटे त्या राज्यांत सतत चालू असत. ह्या तंव्यांनींच त्या राज्याचा इतिहास भरलेला आहे. तथापि मुसलमानांच्या जातीवरून त्यांचा धर्म ओळखतां येण्याजोगा नाहीं. ज्याच्या त्याच्या मर्जीप्रमाणें त्यास शिया किंवा सुनी धर्म स्वीकारतां येतो. बहामनी राज्यसंस्थापक इसन गंगू हा शियापंथी असून त्याचाच मुलगा महंमदशहा हा सुनी होता. बहामनी राज्यांत पुष्कळ आरब व हबसी लोकांचा भरणा होता म्हणून परदेशी असूनही ते दक्षिणी पंथांत गणले जात. तसेंच खुद्द दक्षिणचे पुष्कळ लोक बाढून शियापंथी झाले, त्यांचा समावेश परदेशी पक्षांत होई.

**हसन गंगू ऊर्फ अलाउद्दीनशहा, (सन १३४७-१४५७)** - हसन गंगूची पूर्वपीठिका माहीत नाहीं. तो दिल्लीस गंगू नामक ब्राह्मणाच्या घरी वाढला होता. सुलतान झाल्यावर त्यानें त्या ब्राह्मणास आपल्या पदरीं खजिनदारीचें काम सांगितलें. धर्माचे बाबतींत इसन आग्रही नव्हता. मलीक काफूर व खुसूखान ह्यांप्रमाणेंच धन्याची मर्जी संपादून तो महत्पदास चढला. त्यांच्याप्रमाणेंच धर्माच्या बाबतींत कांहीं कपट करून दक्षिणेतील हिंदु राजांना त्यानें आपल्या पक्षास वळविलें. शियापंथी अब्बसी खलीफांप्रमाणें त्यानें आपल्या शिरावर कृष्णछत्र धारण केलें.

गंगू ब्राह्मणावर महंमद तुघ्लखाची मेहेरबानी असे. त्या ब्राह्मणाजवळ इसन हा गुलाम होता. इसनचें इमानी वर्तन पाहून, त्यास गंगू ब्राह्मणानें कांहीं जमीन व एक बैलाची जोडी दिली. ती जमीन नांगरीत असतां तींत हसनास एक मोहोरांचा हांडा सांपडला. तो त्यानें नेऊन आपल्या धन्यास नजर केला. ह्या इमानीपणाबद्दल ब्राह्म- णानें इसनची सुलतानापाशीं तारीफ केली. सुलतानानें खूष होऊन हसनास दहा हजार स्वारांची सरदारी दिली. ब्राह्मणानें त्याची जन्मपत्रिका पाहून भविष्य केलें कीं, 'तुला राज्यप्राप्ति होईल'. तसें झाल्यास स्वतःच्या नांवास गंगू हैं पद जोडून, आपणास फडणिशीचें काम देण्याचें ब्राह्मणानें इसनाकडून वचन घेतलें. पुढें सुलतानानें इसनास दक्षिणच्या सुभेदाराच्या मदतीस पाठविलें. गुजरातेंतील बंड सुलतानानें मोडल्यावर तेथच्या कित्येक बंडखोरांस दक्षिणच्या सुभेदारानें आश्रय दिला, त्याबद्दल शहा सर्वांसच शासन करणार, असें ऐकून ते त्याजवर उठले, त्यांनी दौलता- बादचा किल्ला इस्तगत करून इस्माईलखान ह्यास नासिरुद्दीन हा किताब देऊन आपला सुलतान केलें. ह्या समयीं इसन ह्यास जाफरखान हा किताब मिळाला. पुढें महंमदानें ह्या बंडवाल्यांवर स्वारी केली, पण दिल्लीस बंड झाल्याचें वर्तमान आल्या- मुळे दक्षिणेंतील काम तसेंच सोडून महंमद तुघ्लख दिल्लीस गेला. मागे राहिलेल्या त्याच्या सैन्यावर जाफरखानानें स्वारी करून, त्याची दाणादाण केली, आणि बेदर व कंधार हे किल्ले काबीज केले. नंतर जाफरखान दौलताबादेस गेल्यावर नासिरुद्दीननें राज्याचा कारभार खुशीनें सोडून, जाफरखान यास दिला (ता. १२ ऑगस्ट सन १३४७). जाफरखानानें अला-उद्दीन हसन असा किताब धारण केला आणि आपल्या नांवाचीं नाणीं पाडिलीं. कलबुर्गा शहरास इसनाबाद असे नांव देऊन तेथे त्यानें आपली राजधानी केली. अलाउद्दीन हा हुशार व धोरणी असून वेळ पडेल तसे वागणारा होता. प्रथम त्यानें हिंदु राजांचा चांगला स्नेह संपादिला, आणि आपला कार्यभाग उरकतांच, तो त्यांजवर उलटला. गजनीच्या महंमुदासारखा तो हिंदु धर्म- द्वेष्टा नव्हता. कोणत्याही प्रकारानें राज्यप्राप्ति व्हावी एवढीच त्याची इच्छा होती. मुसलमानांचा कडवेपणा त्यानें आपल्या वर्तनांत दाखविला असता, तर त्याचे काम साधलें नसतें. तथापि केवळ स्वार्थावर दृष्टि देऊन, आपणास साह्य करणाऱ्या हिंदु राजांगीं तो पुढें कृतघ्नपणानें वागला, स्याचें राज्य दिवसेंदिवस वाढत गेलें, मलीक सैफुद्दीन घोरी त्यास त्यानें आपली बजिरी दिली. गंगू ब्राह्मणास दिलेले वचन न विसरतां, त्यानें आपल्या नांवास गंगू बहामनी असा किताब जोडिला, आणि त्या ब्राह्मणास दिल्लीहून आणवून आपल्या पदरी इतमामानें ठेविलें. पुढें अकरा वर्षेपर्यंत न्यायानें राज्य करून बहामनी राज्याचा हा संस्थापक सन १३५८ व्या वर्षी ६७ वर्षांचा होऊन मरण पावला.

ह्या नवीन राज्याचा विस्तार मुख्यतः सर्व महाराष्ट्रदेशास व्यापून होता. उत्तरेस नर्मदा नदी, पश्चिमेस सह्याद्रि पर्वत, दक्षिणेस कृष्णा नदी आणि पूर्वेस तैलंगणचें राज्य व गोंडवणचें रान, अशा त्याच्या मर्यादा होत्या. ह्या राज्यास आरंभीं समुद्र किनारा नव्हता. सरहद्दीवर माळव्यांत व खानदेशांत नवीनच मुसलमानी राज्यें स्थापन झालीं होतीं. इतर बाजूंस हिंदु राज्यें असून बहामनी राज्याची प्रजा मुख्यत्वेंकरून हिंदु होती. ह्यामुळें हिंदु चालीरीतींचें विशेष वजन ह्या राज्यांत होतें. कृष्णेच्या दक्षिणेस तुंगभद्रा नदीच्या कांठीं विजयनगर येथे वरंगळच्या राजघराण्यांतील एका पुरुषानें नवीन हिंदु राज्याची स्थापना केली, त्याची हकीकत स्वतंत्र दिली आहे. हेंच राज्य पुढें बलाढ्य होऊन त्याचें बहामनी राज्याशीं वैर जुंपलें. बहामनी राज्याची राजधानी कलबुर्गा शहर विजयनगरच्या उत्तरेस व वरंगळच्या पश्चिमेस, दीडशें मैलांवर होतें, ह्या दोन विधर्मी राज्यांचा अव्याहत झगडा म्हणजे ह्या वेळचा महाराष्ट्राचा इतिहास होय. ह्या झगड्यांत दोनशें वर्षेपर्यंत हिंदूंनी मुसल- मानांशीं त्यांच्या बरोबरीनें सामना करून आपला धर्म व राज्य बचावण्याची शिकस्त केली.

**महंमदशहा, (सन १३५७-१३७४) —**

अला-उद्दीन ह्यास दाऊद व महंमद असे दोन मुलगे होते. महंमद हा हुशार असून, त्यानेंच पुढें गादीवर बसावें, असें बापानं ठरवून ठेवले होतें. त्यानें आपल्या नांवाचीं नवीं चौकोनी नाणीं पाडिलीं. पहिली असलेलींच नाणीं राहादीं, असें हिंदु लोकांच्या मनांत असल्यामुळें, हीं नवीं नाणीं ते वितळवून टाकीत; त्याबद्दल शहानें पुष्कळ हिंदु लोकांस कडक शिक्षा केल्या. विजयनगरचा व वरंगळचा राजा हे एक होऊन, कौलास वगैरे आपले गेलेले प्रांत परत घेण्याविषयीं महंमदशहाबरोबर लढण्यास आले. तैलंगणचे राजाचा मुलगा विनायकदेव हा त्यांचा सेनापति होता. कौलास प्रांताचा सुभेदार बहादूरखान ह्यानें त्यांचा पराभव केला, तरी पुनः युद्ध सुरू होऊन शहा स्वतः फौज घेऊन तैलंगणांत वेलंपट्टण म्हणजे हल्लीं बेलमकोंडा नांवांचें शहर आहे त्यावर गेला. तेथे विनायकदेवास त्यानें ठार मारिलें. लूट घेऊन परत येत असतां, त्याचे फार हाल झाले आणि बहुतेक लोक मेले. दिल्लीचे बादशहा- विरुद्ध हसन गंगू ह्यास मदत करून आपण आपल्या दाराशीं एक नवीन शत्रु आणून उभा केला, ह्याची उमज ह्या वेळीं हिंदुराजांस पडली. ह्या अडचणीच्या प्रसंगी हिंदु राजांनी दिल्लीचा सुलतान फिरोज तुम्लख ह्यास उत्तरेकडून स्वारी करण्याविषयीं भर दिली; पण त्यानें तें मनावर घेतलें नाहीं. पुनः युद्ध सुरू होऊन बहामनी सुलतानानें तैलंगणावर स्वारी केली; तेव्हां तेथच्या राजानें ३३ लाख रुपये व गोवळकोंड्याचा किल्ला महंमदशहास देऊन तह केला, आणि तख्त-इ-फेरोज (अस्मानी तख्त ) नांवाचें एक रत्नजडित सिंहासन महंमदशहास नजर करून, पुनः आपणास त्रास देऊं नये असा करार लिहून घेतला. तेंच सिंहासन पुढें बहामनी शहांनी वापरिलें. त्याची किंमत चार कोट रुपये असून, तें नऊ फूट लांब व तीन फूट रुंद होतें. त्यापुढें विजयनगरचे राजाशीं शहाचें युद्ध सुरू झालें. विजयनगरचा राजा ह्या राजधानी कलबुर्गा शहर विजयनगरच्या उत्तरेस व वरंगळच्या पश्चिमेस, दीडशें मैलांवर होतें, ह्या दोन विधर्मी राज्यांचा अव्याहत झगडा म्हणजे ह्या वेळचा महाराष्ट्राचा इतिहास होय. ह्या झगड्यांत दोनशें वर्षेपर्यंत हिंदूंनी मुसल- मानांशीं त्यांच्या बरोबरीनें सामना करून आपला धर्म व राज्य बचावण्याची शिकस्त केली. सुमारास फार प्रबळ असून बहुतेक दक्षिण हिंदुस्थान त्याचे ताव्यांत होतें. त्यानें मुसलमानांशीं अत्यंत निकरानें टक्कर दिली. मुसलमानांचा मुद्रलचा किल्ला सरहद्दीवर होता, तो त्यानें घेतला, आणि तेथील सर्व लोकांची कत्तल केली; त्यामुळें संतापून एक लाख हिंदूंस ठार मारण्याची महंमदशहानें प्रतिज्ञा केली. दोनही फौजांची तोंडातोंडी होतांच हिंदु लोकांनीं तोफांचा उपयोग केला असें म्हणतात. ह्या विजयानें लढाई संपली नाहीं. अध्वनीनजीक पुनः एक निकराची लढाई झाली. विजयनगरच्या राजानें भोजमल ह्यास आपल्या सेनेचें आधिपत्य दिलें होतें. ह्या लढाईत तोफखाना होता. भोजमल्लास जखम लागली आणि तो पळून गेला; तेव्हां हिंदु लोक आपला जमाव सोडून चालते झांले, (१३६६). पुढें कांहीं दिवस युद्धसंग्राम चालून उभयतांमध्यें तह झाला. ह्या लढाईनंतर महंमदशहाचे कांहीं दिवस अंतर्गत बंडे मोडण्यांत गेले. महंमदशहाने चोर, रामोशी इत्यादि दुष्ट लोकांचा बंदोबस्त केला.

एकंदरीत महंमदशहानें राज्य शहाणपणानें केलें. तो लोकांची दाद घेण्यासाठीं वारंवार प्रांतांतून फिरत असे. स्याच्या दरबारचें वैभव मोठें होतें. सतरा वर्षे राज्य करून हा शहा सन १३७४ त मरण पावला. मलीक सैफू उद्दीन घोरी हा त्याचा दिवाण होता.

**महंमदशहानंतर झालेले सुलतान —**

ह्या पुढील राज्यकर्त्यांचे महत्त्व ऐतिहासिक दृष्टया विशेष नाहीं. कित्येक सुलतान सगुणी व कित्येक दुईत्त निघाले. त्यांच्या कारकीर्दीत हिंदु व मुसलमान ह्यांजमध्यें एकसारखे युद्धप्रसंग चालू होते. शिया व सुनी, किंवा परदेशी व दक्षिणी ह्या दोन पक्षांतील कलह कधीही मिटले नाहींत. मुसलमानी धर्मावर हिंदूंची छाप विशेष बसत चालली, आणि मुसलमान लोक आपला मूळचा कडवेपणा विसरत चालले. मुजाहिद्दाहा ( सन १३७४-१३७८ ) - सेफू-उद्दीनची मुलगी महंमदशहास दिली होती, तिच्या पोटीं मुजाहिद्ाद्दाचा जन्म झाला. हा शूर, धीट व बळकट होता. तो १९ व्या वर्षी तख्तावर बसला. लवकरच विजयनगरच्या राजाबरोबर त्याचें युद्ध सुरू झालें. उभयतांनीं लढाईची जंगी तयारी केली. पण मुसलमानांची कडेकोट तजवीज पाहून, हिंदु लोकांच्या सैन्यानें पळ काढिला. त्यांचा पाठलाग शहानें चालविला, आणि शेवटीं दोनही फौजा विजयनगरांत आल्या. अनेक लढाया होऊन त्यांत मुजाहिदूशहाच्या अद्वितीय पराक्रमामुळें मुसलमान विजयी झाले. ह्या वेळीं मुसलमानांस अपार संपत्ति व पुष्कळ मुलूख मिळाला. मार्गातील कित्येक किल्ले घेऊन शहा कलबुर्गा राजधानीस परत आला. शहाचा चुलता दाऊदखान यानें राज्यलोभानें मुजाहिदूशहास मारेकरी घालून ठार मारिलें. (सन १३७७).

**दाऊदशहा, (सन १३७८) —**

दाऊद नांवाचा महंमदशहाचा भाऊ कलबुर्गा येथील किल्ल्यावर कैदेंत होता. तो तेथून सुटून राज्य मिळविण्याची खटपट करूं लागला. पिढीजाद वजीर व राज्याचा आधारस्तंभ मलीक सैफू-उद्दीन ह्यानें दाऊदशहाची सत्ता कायम होण्याबद्दल पुष्कळ प्रयत्न केले. पण त्या कृत्यास वजि- राच्या मुलीची मुलगी व मुजाहिद्शहाची बहीण रूपवरआधा हिनें मात्र रुकार दिला नाहीं. तेव्हां घोरी रजा मागून घरी बसला. दोन महिन्यांच्या आंत रुपवर- आधा दिनें शहाचा खून करविला.

**महंमूदशहा, (सन १३७८-१३९६) —**

रूपवर आधानें दाऊदशहाच्या मुलाचे डोळे काढिले; आणि अला-उद्दीनचा कनिष्ठ पुत्र महंमूद ह्यास तख्तावर बसवून, त्याचे नांवाची द्वाही फिरविली. हा शहा दयाशील, सद्‌गुणी व न्यायी होता. त्यानें घोरी ह्यास पुनः वजिरी दिली, तेव्हां पूर्ववत् स्वस्थता झाली. हा शहा विद्वान् होता. त्यास कवितेची अभिरुचि होती. त्यानें एकपत्नीव्रत पाळिलें. इराण, आरब- स्तान ह्या देशांतून अनेक विद्वान् गृहस्थ दक्षिणेत येत, त्यांस हा चांगलें उत्तेजन देई. सर्व मोठमोठ्या शहरांतून त्यानें शालागृहें व अनाथबालगृहें स्थापन केलीं, आंधळ्या लोकांस नेमणुकी बांधून दिल्या, आणि राज्यांत मुसलमानी धर्मोपदेशक नेमिले. दुष्काळ पडला असतां स्वतः दहा हजार बैल ठेवून, सर्वांस स्वस्त दरानें धान्य देण्याची तजवीज त्यानें केली. तो अशा रीतीनें गरिबांचा चांगला परामर्ष घेई. त्याची कारकीर्द शांततेची झाली. त्यास दक्षिणचा ॲरिस्टॉटल अशी संज्ञा इतिहासकार देतात. तो इसवी सन १३९७ त मरण पावला. त्याच्यामागून दुस- व्याच दिवशीं तख्ताचा आधारस्तंभ व प्रथमपासून नोकरी केलेला प्रसिद्ध वजीर मलीक सैफ्-उद्दीन घोरी हाही मरण पावला. महंमूदशहाचे मागून त्याचे दोन मुलगे तख्तावर आले, पण थोड्याच काळांत दरबारांतील कांहीं मंडळींच्या गुप्त कारस्थानांत सांपडून ते पदच्युत झाले. नंतर दाऊदखानाचा मुलगा फिरोजशहा तख्तावर बसला.

**फिरोजशद्दा, (सन १३९६-१४२२) —**

या शहाच्या कारकीर्दीत बहामनी राज्याच्या वैभवाचा कळस झाला. त्यानें विजयनगरच्या राजाच्या मुलीशीं बळजबरीनें लग्न लाविले; आणि मुसलमानी धर्मास पुष्कळ उत्तेजन देऊन सभों- वारच्या प्रदेशांवर स्वाऱ्या करून राज्याची मर्यादा वाढविली. तो उदार होता. दारू पिण्याशिवाय इतर गोष्टींत तो अगदीं धर्मशास्त्राप्रमाणे वागत असे.

खासगी मंडळींत तो सर्वांशीं साधेपणानें वागे. पण परधर्मीयांशीं त्याचे वर्तन कठोर होतें. राज्यकार- माराचे विषय व दुसऱ्याची पाठीमागें निंदा करणे, त्या दोन गोष्टी मात्र त्यानें मना केल्या होत्या. त्याचा शिक्षक मीर फैजू-उल्ला अंजू ह्यास त्यानें आपला वजीर नेमिलें. ग्रहानें परदेशांतून मोठमोठे विद्वान् स्वतःच्या खर्चानें आणविले. त्यास पुष्कळ भाषा अवगत असून परकीय विद्वानांशीं तो त्यांच्याच भाषेत बोलण्याचा प्रयत्न करी. त्यान्ची स्मरणशक्ति चांगली होती. अंजूचें घराणें दक्षिणेतील प्रसिद्ध सय्यद वंशां- तील होतें. ह्या घराण्याशीं शहानें प्रथमतः शरीरसंबंध केले. ह्याचा जनानखाना मोठा होता. त्यांत सर्व देशांतल्या स्त्रिया होत्या. भीमेच्या कांठीं फिरोजाबाद नांवाचे एक शहर त्यानें बसविलें, आणि तेथे जनानखान्याकरितां तटबंदी वाडा बांधिला, तो अद्यापि आहे म्हणतात. ह्या राजाच्या रंगेल स्वभावामुळे त्याचें नांव पूर्वी लोकांच्या तोंडीं कायम होतें. क्रिस्ती धर्मशास्त्र वाचण्याचा नाद त्यास विशेष होता. कलबुगां शहरांत त्यानें बांधिलेले वाडे आतां पडून गेले असून स्पेनच्या धर्तीवर बांधलेली एक मशीद मात्र आहे.

विजयनगरच्या राजांशीं कलह नेहमींचेच होते. तेथील देवरायानें मुसल- मानांच्या रायचूर दुआबावर स्वारी केली, आणि तैलंगणचा राजा नरसिंह- राय ह्यानें वाडवर स्वारी केली. फिरोजशहा प्रथम देवरायावर चालून गेला. दोनही फौजा कृष्णेच्या दोन कांठांवर उतरल्या होत्या. फिरोजशहास नदी उतरून देवरायाच्या फौजेवर जातां येत नव्हतें. तेव्हां सिराज नांवाचा एक कसबी काजी देवरायाच्या छावणींत शिरून एका कलावंतिणीबरोबर राजपुत्राच्या गोटांत गेला, आणि बायकोच्या वेषानें सुरे वगैरे घेऊन रात्रीं राजपुत्रासमोर आपला नाच दाखवूं लागला. नाच पाहण्यांत राजपुत्र तल्लीन झाला असतां, ह्या कपटवेषी काजीनें एकदम त्यास वार करून कापून काढिलें, तेव्हां हिंदु सैन्यांत एकच गोंधळ झाला. दुसरे दिवशीं फिरोजशहा आपल्या फौजेसह नदी उतरून अलीकडे आला; आाणि भस्ताभ्यस्त झालेल्या हिंदु सैन्याचा पाठलाग करीत विजयनगरपर्यंत चालून गेला. तेव्हां देवराया टेंकीस येऊन त्यानें पुष्कळ दंड भरून फिरोजशहाशीं तह केला. नरसिंहरायानें वऱ्हाड प्रांतावर स्वारी केली होती, त्याजवर फिरोजशहानें आपला भाऊ खानखानान व मीर फैजू-उल्ला त्यांस रवाना केलें. आरंभी हिंदूस जय मिळाला; पण पुढें मुसलमानांनी निकरानें हल्ले केले, ते त्यांस सहन न होऊन, नरसिंहरायानें फिरोजशहाचा मांडलिकपणा कबूल करून तह केला, (सन १३९९); आणि आपली एक मुलगी शहाच्या जनानखान्यांत पाठविली. ह्याच सुमारास तयमूरलंगानें दिल्लीवर स्वारी केली, आणि तो सर्व हिंदुस्थान देश काबीज करणार अशी वर्दता आली. त्याचा प्रतिकार करण्यासाठीं फिरोजनें आपले वकील तयमूरलंगाकडे पाठवून त्याचें सार्वभौमत्व कबूल केलें. तयमूरलंगानेंही खुष होऊन शहास नजराणे पाठविले. ह्या कृत्यामुळे गुजरात व माळवा येथील शांस फिरोजशहाविषयीं मत्सर उत्पन्न होऊन, त्यांनी विजयनगरच्या राजाशी गुप्त संधान लाविलें आणि फिरोजशहाशीं कटकट सुरू केली. ह्यास आणखी विशेष कारण असें झालें कीं, मुद्गल शहरीं एका सोनाराची निटाल नांवाची एक रूपवती मुलगी होती. विजयनगरच्या राजानें तिच्या बापाकडे तिची मागणी केली. मुलीस ती गोष्ट पसंत पडली नाहीं. तेव्हां राजानें मुलीस पकडण्यासाठीं फौज घेऊन मुद्गल शहरावर हल्ला केला. पण निहाल पळून गेली. तो मुलूख फिरोजशहांचा असल्यामुळें त्यास मोठा राग आला आणि मोठें सैन्य घेऊन तो विजयनगरावर चालून आला. तेव्हां देवरायानें गुजरात, माळवा, खानदेश वगैरे ठिकाणच्या सुलतानांकडून मदत मागितली; पण ती आली नाहीं. शेवटीं सन १४०६ मध्यें मुसलमानांनीं हिंदूस अगदी जर्जर केलें. तेव्हां देवरायानें आपली कन्या व बंकापूरचा किल्ला शहास देऊन तह केला. शहाचें व ह्या मुलीचं लग्न मोठ्या थाटानें विजयनगरास झालें. निहालबाईचे लग्नही शहाजादा हसनखान ह्याजबरोबर झाले. पुढें. सन १४१७ सालीं शहानें तैलंगणाच्या मुलुखावर हल्ला केला, त्यांत वजीर मीर फैज्-उल्ला अंजू हा पडल्यामुळे मुसलमानांची हिंदूंनी खोड मोडिली; आणि पूर्वीच्या वैराचा सूड उगविला. ह्याच अपजयामुळे शहा अमिष्ट झाला. त्या भ्रमांत त्यानें आपला पराक्रमी भाऊ खानखानान हा पुढे राज्यावर हक्क सांगेल, म्हणून त्याचे डोळे काढण्याचा बेत केला. त्यामुळे खानखानान पळाला. आणि त्यानें लढाईची तयारी केली. युद्ध होऊन शहाचाच पराभव झाला. ह्या कामी आग्रह धरणें वेडेपणाचें आहे असें पाहून, फिरोजशहानें आपला मुलगा इसनखान याला आपल्यामांगें राज्य मिळू नये, म्हणून स्वतःच्या देखत भाऊ खानखानान ह्यास अहंमदशहा बहामनी असें नांव देऊन तख्तावर बसविले, आणि आपण कारभार सोडिला, नंतर दहा दिवसांनीं फिरोजशहा मरण पावला (सन १४२२).

**अहंमदशहा वली, (सन १४२२-१४३४)**

वली म्हणजे साधु. बहामनी शहांनीं विद्येस उत्तेजन देण्याकरितां अनेक पाठशाळा बांधिल्या; आणि अनेक साधूस इनामें करून दिलीं. अहंमदशहा हा विद्वान् व साधु लोकांस फार मान देत असे, म्हणून त्यास वली हें नांव मिळालें. सय्यद महंमद जिसू दुराज ह्या साधूच्या घराण्यास त्यानें मोठमोठीं इनामें करून दिलीं; माजी शहाच्या प्रधानास त्याच्या पहिल्या जागेवर कायम केलें आणि फौजेची शिस्त सुधारली. तसेंच पुतण्या इसन ह्यास फौजेंत असामी व राहण्यास स्वतंत्र वाडा दिला. येणेंप्रमाणें अनेक सत्कृत्यांनी ह्या शहानें लोकांची प्रीति संपादन केली. नेहमींप्रमाणें विजयनगर व केरळ येथील राजांनीं शहाबरोबर युद्ध आरंभिलें, अहंमदशहा हाही फौज घेऊन लढाईस गेला. एके दिवशीं छापा घालून देवरायास मुसलमानांनीं कैद केले; पण तो सुरून पळून गेला. तेव्हां मुसलमानांनीं नाना प्रकारें विजयनगरच्या मुलुखास त्रास दिला. तेव्हां शहाचा पाडाव करण्याच्या हेतूनें हिंदु लोकांनी हरत-हेचे प्रयत्न केले, पण त्यांत त्यांस यश आलें नाहीं. पुढें देवरायानें पुष्कळ ऐवज देऊन शहाशीं तह केला. सन १४२३ सालीं दक्षिणेंत मोठा दुष्काळ पडला. सन १४२४ सालीं बरंग- ळच्या राजावर अहंमदशहानें स्वारी केली, आणि राजास ठार मारून त्याचा बहुतेक प्रांत जिंकिला, तसेंच त्यानें अनेक हिंदु लोकांस ठार मारिलें; आणि बायकापोरांस बाटवून मुसलमान केलें. ह्या स्वारींत शहास एक हिऱ्यांची खाण सांपडली. मुलखांत हिंदु लोकांचीं असलेलीं देवळें पाडून तेथे त्यानें मशिदी बांधविल्या, आणि त्यांच्या खर्चास उत्पन्नें बांधून दिली. वऱ्हाड प्रांतांतील गाविलगड व नरनाळा हे दोन जुने किल्ले शहानें दुरुस्त केले. सन १४२६ सालीं माळव्याच्या सुलतानाशीं लढाई करून त्याचा 'अहंमदशहानें पराभव केला. नंतर बेदरनजीक शहा शिकारीस गेला असतां, तेथे एक नवीन शहर वसवावें असें मनांत येऊन त्यानें अहंमदाबाद वेदर नांवाचें शहर वसविलें. बेदर ही पूर्वी हिंदु राजांची राजधानी होती. ह्या शहरी पूर्वी राजा भीमसेन होऊन गेला, त्याची कन्या दमयंती निषध देशच्या नळराजास दिलेली होती, अशी कथा आहे. बेदरास अहंमदंशहानें खडकावर एक किल्ला बांधिला, तो पुढें अत्यंत बळकट म्हणून नांवाजला गेला. हें नवीन शहर त्यानें आपली राजधानी केलें. नंतर कित्येक दिवसपर्यंत कोंकणपट्टी व गुजरात ह्या प्रांतांत शहानें स्वाऱ्या केल्या. मेसापोटेमिया प्रांतांत कर्वेला म्हणून १४ सय्यदांचे ठिकाण आहे. त्या ठिकाणच्या सय्यदांस शहानें अनेक दानधर्म केले. त्यानें इराण वगैरे देशांतून पुष्कळ साधूस इकडे आणविलें. सन १४३४ त अहंमदशहा मरण पावला.

**अला-उद्दीन शहा, (सन १४३४-१४५७) —**

हा वेदर येथे तख्तावर बसला. विजयनगरच्या राजानें खंडणी देण्याचें बंद केल्यामुळे त्याजवर फौज पाठवून तिकडून त्यानें पुष्कळ संपत्ति आणली. धाकटा भाऊ महंमदखान ह्यानें बंड केले, तें मोडून त्यास क्षमा करून शहानें रायचूर परगणा त्यास तोडून दिला. सन १४३६ त कोंकणपट्टी जिंकण्यासाठीं दिलावरखानाच्या हाताखालीं मोठें सैन्य रवाना केलें. रायरी व सोनगड येथील राजे लवकरच शरण आले. दिलावरखानानें सोनगडच्या राजाची सुंदर कन्या शहाकरितां नज़र आणिली. तिच्यावर शहाची अत्यंत मर्जी बसली, आणि तीस त्यानें परिचेहर (परि-चेहेरा) असें नांव दिलें. सन १४३७ त खानदेशचा सुलतान नशीरखान यानें बंड केलें, त्यास गुजराथचा राजा सामील झाला. आणीबाणीच्या प्रसंगी मलीक-उत्-तुजार नामक सरदारास शहानें फौजेसह त्याजवर पाठवून, बंडखोरांचे पारिपत्य केलें.

विजयनगरच्या राजास आपले वरचेवर होत असलेला अपमान सहन होईना. कांहीं तरी युक्तीनें मुसलमानांचा पाडाव करण्याचा त्याचा विचार होता. त्यानें पुष्कळ मुसलमान लोक आपल्या नोकरीस ठेवले. त्यांच्याकरितां विजयनगर शहरांत एक मशीद बांधिली. हिंदु राजांस मुंजरा करणें मुसलमानांस अशास्त्र वाटेल, ही शंका दूर करण्याकरितां आपल्या सिंहासनापुढें एका उंच पीठावर त्यानें कुराणाचें पुस्तक ठेविलें त्यामुळे स्वतःचा मान राहून मुसलमान लोक कुराणास मुजरा करितात अप्पा प्रकार बाह्यतः दिसे. अशा उपायांनी मोठी फौज जमा करून, सन १४४३ त तुंगभद्रा उतरून विजयनगरच्या राजानें मुगलच्या किल्लयास वेढा दिला, आणि सभोवारचा पुष्कळ मुलूख तो उद्ध्वस्त करूं लागला. अला-उद्दिनास ही खबर कळतांच तो त्याच्या पारिपत्यास निघाला. पुढें तीन मोठमोठ्या लढाया होऊन शहास जय प्राप्त झाला. तेव्हां देवरायानें पुष्कळ पैसा भरून तह केला.

त्या शहानें पुष्कळ धर्मकृत्यें केली. बेदर येथे भिक्षागृहें स्थापन करून, लोकांस औषधपाणी देण्याकरितां हिंदु व मुसलमान वैद्य ठेविले. दारू पिण्याची सक्त मनाई केली. मुलकी व लष्करी खातीं सुधारली, तथापि हिंदु लोकांस पुष्कळ जाच होई. ब्राह्मणांशीं शहा बोलत सुद्धां नसे किंवा त्यांस कामावर नेमीत नसे.

पुढें शहा व्यसनासक्त झाला. तेव्हां समुद्रकिनाऱ्यावरच्या कोंकणांतील लोकांनीं आपले प्रदेश परत घेण्याचा विचार चालविला. त्यांजवर शहानें मलीक-उत्तुजार ध्यास सन १४५३ त रवाना केलें. तुजानें प्रथमतः शिर्के नांवाच्या एका प्रमुख राजास जिंकिलें, ह्याच कोंकणच्या स्वारींत कित्येक भानगडी घडून आल्या, त्यामुळें दरबारच्या मंडळींत तंट्याचें बीज उत्पन्न होऊन, त्या योगें अखेरीस बहामनी राज्याचा अंत झाला. तुजारनें शिर्यास असा आग्रह केला कीं, 'तू मुसलमान हो, नाहीं तर तुझा जीव घेतों.' ह्या प्रसंगीं त्या धूर्त सरदारानें मोठ्या नम्रतेनें संकट टाळून स्वतःचा बचाव केला. खेळणा म्हणून एक परगणा कोंकणांत आहे. त्यांत विशाळगड व त्याखालील सर्व जंगली प्रदेशाचा समावेश होत असे. शंकरराय नांवाचा एक हिंदु राजा ह्या खेळणा परगण्यावर राज्य करीत होता. 'तो माझा शत्रु आहे, प्रथम आपण दोघे जाऊन त्यास मुसलमान करूं, नंतर मी मुसलमान होईन', असें शिर्त्यानें तुजार ह्यास सांगितलें. खेळणा परगण्यांत जाणें फार अवघड आहे, अशी हरकत तुजारानें दाखविली; पण तें काम आपण पत्करितों, असें शिर्त्यानें कबूल केल्यावर, तुजार त्या गोष्टीस कबूल झाला. तुजार हा मूळचा परदेशी व्यापारी होता. दक्षिणेंत आलेले हे मुसलमान लोक मूळचे इराणी व तुर्की होते. पण इकडे आल्यावर त्यांची पुष्कळ वृद्धि झाली होती. तसेंच हबशी लोकही त्यांच्या पक्षास होते. परंतु परदेशीय लोकांस मोगल अशी संज्ञा त्या वेळच्या इतिहासकारांनीं दिलेली असून, त्यांत बहुतेक सय्यद लोक होते. ते व्यापाराच्या उद्देशानें इकडे आले होते. त्यांचें व दक्षिणच्या मुसलमानांचे बांकडें असे. आजपर्यंत अनेक मोहिमांत तुजार ह्यानें दक्षणी व हबशी ह्यांची मदत घेतली नव्हती. प्रस्तुत प्रसंगीं खेळण्याच्या अवघड प्रदेशांत शिरण्याचें दक्षणी व हबशी कामगारांनीं नाकबूल केलें, आणि ते आपल्या फौजांसह तुजारास सोडून मार्गे राहिले. शिर्याच्या मसलतीनें तुजार हा अत्यंत अवघड जंगली प्रदेशांतून खेळणा प्रदेशाच्या अगदीं निबिड अरण्यांत शिरला. तेथील हवा खराब असल्यामुळे लोकही पुष्कळ आजारी पडले. अशा स्थितींत शिऱ्यांनें शंकररायास एकदम येऊन हल्ला करण्याविषयीं खबर दिली. शंकरराय मोठी फौज घेऊन निघाला. त्यानें एका- एकीं छापा घालून सर्व मुसलमानांची कत्तल केली. तुजारही मारला गेला. कांहीं वांचले ते परत जाऊन दक्षिणी फौजेस मिळाले, आणि तेथून सर्व लोक चाकणच्या किल्ल्यावर गेले.

वरील अपजयामुळे दक्षिणी व परदेशी या दोन पक्षांमध्यें जास्तच तंटे माजले. परदेशीय सय्यद लोकांचा संपूर्ण नाश करण्याकरितां, दक्षिणी कामगारांनीं शहाकडे भलभलत्या हकीकती लिहून पाठविल्या; आणि त्याजकडून सर्व परदेशी अंमलदारांस पकडण्याचा हुकूम आणिला. हे परदेशी अंमलदार चाकणच्या किल्ल्यांत कोंडले गेले. शेवटीं सभयतांचें युद्ध होऊन त्यांतून कांहीं मोगल बचावून शहाकडे गेले. तेथें शहास त्यांनीं खरी हकीकत कळवून त्याजकडून दक्षिणी लोकांचा सूड घेवविला (सन १४५३). ह्या कारकीर्दीच्या अखेरीस अनेक ठिकाणीं बंडें उद्भवली पण तीं शहानें मोडिलीं. खाजेखान महंमद गवान हा प्रथमतः ह्या शहाच्या लष्करांत उद्यास आला. पायावर व्रण होऊन त्या योगानें इ. सन १४५७ या सालीं अला- उद्दीनशहा मरण पावला. तो मोठा वक्ता, धूर्त राज्यकर्ता व विद्येचा भोक्ता होता.

**हुमायूनशहा जालीम व निजामशहा, (१४५७-१४६२)**

अला-उद्दीनशहाचा मुलगा हुमायून हा तख्तनशीन झाला. त्यानें खाजेखान महंमद गवान ह्यास मलीकउत्तुजार असा किताब देऊन, आपला वजीर केलें. प्रथमतः शिकंदरखान नामक सरदारानें केलेलें बंड शहानें मोडिलें, आणि नवलगुंदचा किल्ला घेतला. राजधानींत त्याचा भाऊ इसनखान ह्यानें गादी मिळविण्यासाठीं बंड केलें त्या वेळीं अत्यंत क्रूरपणानें शहानें हसनखानाचा वध केला, आणि त्याच्या सात हजार अनुयायी मंडळींस अतिशय हाल करून ठार मारिलें (सन १४६०). शेवटीं त्याचा कोप इतका अनावर झाला, की कोणासही त्याच्या भेटीस जाणें झाल्यास, मरणाची तयारी करून बायकापोरांचा निरोप घेऊन जावें लागे. परंतु लवकरच सन १४६१ त शहा मरण पावला.

नंतर हुमायूनशहाचा मुलगा निजामशहा तख्तावर बसला. तेव्हां तो आठ वर्षांचा होता. बापाच्या इच्छेनुरूप त्याची आई सर्व कारभार पाहात असे. खाजेखान महंमद गवान हाच मुख्य वजीर होता. त्याच्या सल्ल्यानें ती कारभार

करी. आरंभीं ओढ्या प्रांताच्या राजानें राजमहेंद्रीच्या रस्त्यानें शद्याच्या मुलखावर स्वारी केली. परंतु तींत त्याचाच पराभव झाला. पुढें माळव्याच्या सुलतानानें दक्षिण देशावर स्वारी केली, तींत शिकंदरखान तुर्क ह्या सरदाराच्या भित्रेपणामुळें निजामशहास अपयश आलें, आणि तो राजधानी बेदर येथे पळून आला. पुढे माळव्याच्या सुलतानानें त्याचा पाठलाग करून बेदर राजधानी घेतली. परंतु इतक्यांत गुजराथच्या सुलतानानें निजामशहास मदत पाठविली, त्यामुळे माळव्याचा सुलतान परत गेला. वाटेंत त्यास महंमद गवानानें अत्यंत जेरीस आणिलें. बहामनी राजघराण्यांत मुलांमुलींचीं लग्नें फार लहानपणींच होत असत, त्याप्रमाणें निजाम- शहाच्या आईनेही आपल्या मुलाचें लग्न लहानपणींच मोठ्या थाटानें केलें. ज्या दिवशीं लग्न झालें त्याच दिवशीं शहा मरण पावला (सन १४६३).

**महंमदशहा दुसरा, (सन १४६२-१४८२ ) —**

निजामशहाच भाऊ महंमदशहा त्यास मुत्सद्दी मंडळीनें तख्तावर बसविलें. तोही नऊ वर्षांचाच होता. लहानपणापासून त्याच्या शिक्षणाची व्यवस्था चांगली ठेविल्यामुळे, पुढें तो फार विद्वान् झाला. बहामनी शांत फिरोजशहाच्या खालोखाल हाच विद्वान् होता. आरंभींच अधिकारासंबंधानें ख्वाजाजहान व महंमद गवान ह्या दोघां मुत्सयांत स्पर्धा उत्पन्न झाली. शहाच्या आईनें ख्वाजाजहान ह्यास ठार मारून तंट्याचें मूळ मिटविलें; तेव्हां महंमद गवान हाच मुख्य कारभारी झाला. ह्या वेळेपासून दक्षिणी तटाचे पारडें इलकें होऊन गवानचा परदेशी पक्ष महत्त्वास चढला. सन १४६७ मध्ये माळव्याच्या सुलतानानें दक्षिण देशावर स्वारी केली. तेव्हां कित्येक दिवस युद्ध होऊन माळव्याच्या सुलतानाचा पराभव झाला, आणि दोघांमध्यें अखेरीस सलोख्याचा तह ठरला.

कोंकणपैकी दाभोळ, चौल व त्याच्या वरचे जुन्नर, चाकण, कोल्हापुर, वाई वगैरे प्रांत बहामनी राज्याच्या अमलाखालीं आले होते. तथापि कोंकणांत कांहीं हिंदु राजांचा अंमल चालू होता. सन १४६९ त खेळणा ऊर्फ विशाळगड येथील राजा शंकरराय ह्यास आणि इतर शिरजोर राजांस जिंकण्याकरितां महंमद गवान मोठी फौज घेऊन निघाला. शंकररायाचा अंमल समुद्रापर्यंत असून त्याजजवळ तीनशें जहाजांचे आरमार नेहमी लढाईस तयार असे. त्याच्या मदतीनें तो मुसलमान व्यापाऱ्यांस फार उपद्रव देई. महंमद गवान आपणावर चालून येतो असें समजतांच, सर्व हिंदु राजे एकत्र होऊन लढाईस सिद्ध झाले, महंमद गवान पहाडी पायदळ घेऊन खेळण्यावर आला. त्यानें बरसातीच्या दिवसांत कोल्हापुरास मुक्काम करून दोन वर्षेपर्यंत मोहीम चालविली, आणि शेवटीं खेळणा किल्ला हस्तगत केला. थोडे दिवसांनीं त्यानें विजयनगरच्या ताब्यांतील गोवें शहरही घेतलें (सन १४७३). येणेंप्रमाणें आजपर्यंत अजिंक्य मानलेली कोंकणपट्टी बहामनी राज्याच्या ताऱ्यांत गेली. ह्या विजयामुळे गवानचा लौकिक फार वाढला. त्याचा शहानें बहुमान केला. परंतु गवान हा विरक्त बुद्धीचा असल्यामुळे त्यानें आपली सर्व दौलत गरिबांस वांटून दिली. तो नेहमीं साधा व हलका पोषाख घालून गरिबीनें वागत असे. ओढ्या प्रांताचा राजा अंबरराय ह्यास त्याचा भाऊ मंगलराय उपद्रव देत होता. सन १४७१ सालीं अंबररायास शहाने मदत करून कंडापिली व राजमहेंद्री हीं ठिकाणें मिळविलीं. ह्या मोहिमेंत पुष्कळ नवीन सरदार प्रसिद्धीस आले; आणि त्यांस या कारकीर्दीत मोठमोठीं हुद्द्यांचीं कामें मिळाली. तैलंगणच्या सुभेदारीवर मलीक इसन बहिरी ऊर्फ निजाम-उल्-मुल्क हा सरदार कायम झाला. वऱ्हाडच्या सुभेदारीवर दर्याखान ऊर्फ इमाद-उल-मुल्क हा कायम झाला. यूसुफ आदिलखान नामक दुसरा एक शूर गृहस्थ गवानच्या मर्जीतला होता, त्यास दौलताबादची सुभेदारी मिळाली. या यूसुफनें खानदेशांतले वगैरे पुष्कळ मुलूख काबीज करून बहामनी राज्यास जोडिले. हे सरदार परदेशांतून आलेले होते. त्यांच्या उत्कर्षा- विषयीं दक्षिणच्या मुसलमानांस फार वैषम्य वाटूं लागलें. पुढील वर्षी (सन १४७२), बेळगांवचा वीरकर्णराय हा विजयनगरच्या राजाच्या वतीनें गोवें परत घेण्याचा प्रयत्न करूं लागला. त्याजवर शहानें स्वारी करून बेळगांव घेतले. ह्या स्वारीहून परत येत असतां महंमदशहाची हुशार आई माईराणी मरण पावली. ही स्त्री त्या वेळच्या भरभराटीस पुष्कळ कारण झाली होती. सन १४६८-७५ पावेतों दक्षिणेंत भयंकर दुष्काळ पडला; पर्जन्य मुळींच पडला नाहीं; असंख्य लोक प्राणांस सुकले, बेदर येथील यवन राजाच्या पदरी असलेल्या दामाजीपंत कारकुनानें सरकारी धान्याची कोठारें छुटवून लोकांचे जीव वांचविले. त्या प्रसिद्ध दामाजीची गोष्ट ह्याच दुर्गादेवीच्या ऊर्फ दुर्गाडीच्या दुष्काळांतील असावी. सन १४७७ त ओढचा प्रांतावर पुनः स्वारी होऊन, तेथील राजा भीमराज त्याचा पुष्कळ मुलुख शहाच्या फौजेनें जिंकून घेतला. तसेंच शहानें कर्नाटक व तैलंगण येथील हिंदु राजा नरसिंहराय ह्याजवर स्वारी करून

त्याचाही बराच मुलूख घेतला. ह्या स्वारींत एका किल्लचाची डागडुजी करणे होती, ती महंमद गवाननें त्वरित करवून शहाची मर्जी इतकी संपादन केली, कीं महंमदशहा म्हणू लागला, 'मोठें विस्तीर्ण राज्य व महंमद गवानासारखा नोकर, ह्या दोन अपूर्व देणग्या अल्लानें उदार होऊन मला दिल्या आहेत.' शहानें कांची येथील देवळांवर स्वारी करून अपार संपत्ति मिळविली. ह्या सर्व स्वाऱ्यांत महंमद गवानच्या शहाणपणामुळें यश येत गेलें. त्यामुळे त्याचें वजन फार वाढलें. पण पुष्कळ सरदार त्याचा द्वेष करूं लागले. हा द्वेष वाढण्यास आणखीही कित्येक कारणं झालीं अलीकडे महंमद गवान ह्याजकडे कारभार आल्यापासून राज्याचा विस्तार अतोनात झाला होता. तेव्हां अल्ला-उद्दीन हुसेन गंगूनें केलेल्या व्यवस्थेत फेरफार करणें फार अवश्य झालें. राज्याचे चार सुभे होते ते महंमद गवानानें आतां आठ केले; लष्करच्या व्यवस्थेचे व त्यास वेळेवर पगार देण्याबद्दलचे नियम ठरविले, आणि त्यांची अंमलबजादणी सक्तीनें केली. परंतु अशीं बंधनें स्वतंत्रतेनें वागण्यास संवय झालेल्या सरदारांस रुचलीं नाहींत.

महंमद गवान हा महंमदशहाचा मुख्य वजीर होता. तो बहामनी राज्याचा अत्यंत इमानी व हुशार नोकर असून, त्यानें राज्यकारभारांत फारच उत्तम सुधारणा केली. न्याय, लष्कर, शिक्षण वगैरे राज्यांतील अनेक खात्यांत त्यानें सुधारणा केल्या. इतकेंच नाहीं, तर जमिनीची नवीन मोजणी करून, त्यानें सरकारदेण्याचे दर ठरवून दिले. ह्या पद्धतीचे अवशेष अद्यापि महाराष्ट्रांत दिसून येतात. सन १४७० त बहामनी लष्करास मिळत असलेला पगार सन १८३० च्या इंग्रजी लष्करास मिळत असलेल्या पगारापेक्षां पुष्कळ जास्त होता, शिवाय पैशाची किंमत त्या वेळीं हल्लींच्यापेक्षां फार जास्त होती, तें वेगळेच. ५०० घोडेस्वारांच्या पथकाचा सन १४७० तील वार्षिक खर्च ३,१५,००० रुपये होता. एवढ्याच इंग्रजी लष्कराचा १८३० सालचा खर्च २,१९००० रुपये होता. स्वतःचा घोडा व हत्यारें बाळगणाऱ्या शिलेदारास त्या वेळेस महिना ४० रुपये पगार मिळे. इंग्रजी राज्यांत अशा नोकरास २० रुपये पगार असे. एकंदरींत राज्यांतील सर्व खात्यांचे काम चांगल्या रीतीनें चाललें होतें असें दिसतें. राज्यव्यवस्थेच्या निरनिराळ्या शाखांचा एकमेकांवर दाब इतका व्यवस्थित होता, कीं अन्याय करण्यास जागा नव्हती. मेडोज टेलर. गवानची व्यवस्था महत्त्वाकांक्षी लोकांस आवडली नाहीं. लोकांत असंतोष आहे हें गवानास कळे; पण आपण केलेले नियम सार्वजनिक कल्याणाचे आहेत असें समजून तो स्वस्थ बसला. अशा स्थितींत गवानचा नाश करण्याकरितां, दुष्ट लोकांनीं एक गुप्त बेत केला. गवानचा मदतगार यूसुफ आदिलखान हा नरसिंह- रायावर तैलंगणांत गेला आहे, अशी संधि साधून ते आपली मसलत पार पाडण्याच्या कामास लागले. गवान हा परदेशी पक्षांतला होता; आणि निजाम-उल्मुल्क, इतर दक्षिणी व हवशी मंडळी त्याजवर उठलेली होती. ह्या मंडळीनें गवानच्या मोर्तबाचें असें एक बनावट पत्र ओढ्याच्या राजास महंमदशहा विरुद्ध लिहिलें, आणि तें आपण रस्त्यांत पकडलें असें सांगून, शहाच्या हातांत दिलें. शहा दारू पिऊन गुंग झाला असतां त्यानें एकदम गवान ह्यास आपल्यासमोर आणवून अविचाराने त्यास ठार मारविलें (एप्रिल सन १४८१). त्या वेळीं गवानचे वय ७८ वर्षांचे होतें. महंमद गवानचें नांव केवळ बहामनी राज्यांतच नव्हे, तर इतरत्रही थोर पुरुषांच्या नांवांत साजण्यासारखें असल्यामुळे, त्याची विशेष हकीकत देणें अवश्य वाटतें.

**वजीर महंमद गवान, (सन १४०३-८१).-**

गवानचे पूर्वज इराणांत वजिरीच्या कामावर फार दिवस होते. पुढे त्याच्या घराण्यास राज्यप्राप्ति झाल्यावर महंमद गवान त्याचा जन्म झाला. सुलतान तहमास्प आपणास कांहीं दगा करील, ह्या भीतीनें तो स्वदेश सोडून व्यापाराच्या उद्देशानें बाहेर निघाला. फिरत असतां त्यानें प्रत्येक देशांतील प्रसिद्ध विद्वान् लोकांचा परिचय करून घेतला. पुढें आपल्या वयाच्या ४३ व्या वर्षी दक्षिणेतील विद्वान् मंडळींच्या भेटी घेण्या- करितां तो जलमार्गानं दाभोळ बंदरों आला, आणि तेथून बेदास गेला. बेदराहून पुढें दिल्लीस जाण्याचा त्याचा विचार होता. दुसरा अलाउद्दीनशहा त्यानें त्याचे अलौकिक गुण पाहून त्यास आपले पदीं सरदारी दिली. तेव्हांपासून शहाण- पणानें वागून तो हळुहळू वाढत गेला. तो सुनी पंथाचा होता. महंमदशहावर त्याची अकृत्रिम निष्ठा होती. गवानच्या औदार्याची कीर्ति दूरवर पसरली असून, विद्वानांस त्याचा लाभ मिळाला नाहीं असें एकही शहर नव्हतें. त्याचा स्वभाव मनमिळाऊ असून, त्याची न्याय करण्याची पद्धत निर्दोष होती. दक्षिणेत त्याच्या औदार्याची साक्ष देणारी कामें पुष्कळ आहेत. बेदर येथे त्यानें एक भव्य पाठशाळा स्थापिली. हा स्वतः कवि होता. गणितांत त्याचा हात धरणारा त्यावेळेस कोणी नव्हता. मरणसमयीं आपण निर्दोषी आहों

अशी शहाची खात्री करण्याचा त्यानें पुष्कळ प्रयत्न केला. शेवटीं मरण सुटत नाहीं असें पाहून तो शहास बोलला, 'अशा कृत्यानें तुमच्या नांवास काळिमा लागून तुमचें राज्यही लयास जाईल' शेवटीं तसें झालें. शहाचें बोलावणें आल्यावर त्याजकडे जाऊं नये असें त्यास पुष्कळ स्नेही सांगत असतां, आपल्या खरेपणावर भरवसा ठेवून तो शहाकडे गेला. पण तेथें त्याचा विपरीत परिणाम झाला.

महंमद गवानची योग्यता त्या वेळीं सर्व लोकांत मोठी होती. हिंदुस्थानांतील तत्कालीन मुसलमानांमध्यें इतका थोर व शहाणा मनुष्य निपजला नाहीं असें समजतात. स्वदेशाची नोकरी करितांना स्वार्थ साधण्याची किंवा स्वतः मोठेपणास चढण्याची त्यास यत्किंचित् इच्छा नव्हती. राजावर त्याची भक्ति अगदीं पूर्ण व अकृत्रिम होती. दोन अल्पवयी व अप्रबुद्ध राजांचे त्यानें संगोपन केलें, पण त्यांत स्वतःचा अर्थ साधण्याचा अधमपणा त्यानें केला नाहीं. त्यानेंच थोरपणास चढविलेले सरदार पुढे लवकरच अधिकार बळकावून स्वतंत्र झाले. औदार्यानें व निष्पक्षपातानें त्यान केलेल्या सुधारणा, युद्धकलेंत दिसून आलेलें त्याचें चातुर्य व धीटपणा, स्याची अप्रतिम न्यायबुद्धि आणि खासगी व सरकारी संबंधांत परोपकार करण्याची इच्छा, इत्यादि अनेक गुणांनीं इतिहासांत त्याचें नांव अजरामर झालें आहे. बेदरच्या पाठशाळेंत तो दररोज जात असे. त्याच्या थोरपणाच्या अनेक गोष्टी बहामनी राज्याच्या इतिहासकारांनीं लिहून ठेविल्या आहेत. कोंकणच्या स्वारींतून पस्त आल्यावर राजा व राणी ह्यांनी मुद्दाम जाऊन त्याची भेट घेतली. राजानें तर त्या वेळेस स्वतःच्या अंगावरचा झगा काढून त्याच्या अंगावर घातला. राजा निघून गेल्यावर गवान आपल्या खोलींत जाऊन जमिनीवर अंग टाकून रडू लागला. कांहीं वेळानें त्यानें बेदरच्या लोकांस बोलावून आणिलें, आणि जवळ असलेली सर्व संपत्ति त्यांस बांटून दिली. पुढें लोकांनीं असें करण्याचें कारण त्यास विचारलें, तेव्हां तो म्हणाला, 'जेव्हां राजा माझ्या भेटीस आला आणि प्रत्यक्ष राणीनें मला आपला भाऊ म्हणून हांक मारली, तेव्हां माझ्या मनांत दुष्ट वासना उत्पन्न होऊन माझी विवेकबुद्धि गुंग होऊन गेली. त्यामुळे अत्यंत दुःख होऊन त्या दुःखाचें कारण जी संपत्ति ती मी सर्व वांटून टाकीत आहे'. दर शुक्रवारी तो वेष पालटून लोकांस दानधर्म करीत शहरांत फिरे; आणि ' हूँ तुम्हांस राजानें दिलें आहे,' असें सांगून तो धर्म करी. दूरदूरच्या मुसलमानी राज्यांतील विद्वानांस त्याच्या औदार्याचा प्रसाद मिळत असे.

गवानपाशीं अगणित संपत्ति आहे अशी शहाची समजूत होती. गवानास ठार मारिल्यानंतर त्याच्या खजानजीस त्यानें त्याची संपत्ति दाखविण्यास सांगितलें. त्यानं जीवदान मिळण्याचें वचन घेऊन शहास संपत्ति दाखविली, तो द्रव्य दाखवितांना शहास बोलला, 'गवानला मारण्यापेक्षां हजारों मनुष्य तुम्हीं स्वसंरक्षणार्थ मारिले असते तरी हरकत नव्हती; परंतु ओढयाच्या राजाला पाठविलेलें पत्र खरोखर कोणीं लिहिलें ह्याचा तपास तुम्हीं कां बरें केला नाहीं ? गवानजवळ दोन खजिने होते. एक शहाचा खजिना, त्यांत फौजेच्या वगैरे खर्चाकरितां सुमारें १५००० रुपये शिल्लक होते. दुसरा गरिबांचा खजिना, त्यांत तीनों रुपये होते. बंगल्यांत सामान काय तें निजण्याच्या चटया व स्वयंपाक करण्याचीं मातींचीं भांडी इतकेंच सांपडले. पुस्तकालयांत तीन हजार पुस्तकें होतीं, पण तीं सर्व पाठशाळेस दिलेलीं होती. त्यानें इराणांतून ४० हजारांची रक्कम आपणाबरोबर आणिली होती तिचा तो व्यापार करी व मुद्दल कायम राखून जो फायदा होई, त्यांतून तो दररोज दोन रुपये स्वतःच्या खाण्याकडे व दोन रुपये पोशाख वगैरेकडे खर्च करीः याप्र- माणें त्याचा खाजगी बर्तनक्रम पाहून शहास व गवानच्या शत्रूस फार आश्चर्य वाटलें. शहास तर कृतकर्माचा इतका पश्चात्ताप झाला, कीं त्यामुळे तो झुरणीस लागून पुढें लवकरच मरण पावला. गवान मेल्यावर त्याचे साथीदार होते ते शहास सोडून दूर राहू लागले. त्यांस संतोषविण्यास शहानें पुष्कळ उपाय केले, पण ते सफळ झाले नाहींत. आपल्यामागून मुलगा महंमूद ह्यानें तख्तावर बसावें असा ठराव करून, मार्च सन १४८२ त महंमदशहा मरण पावला.

**महंमूदशहा, (सन १४८२-१५१८)** —

गादीवर बसला तेव्हां महंमूदशहाचें वय बारा वर्षांचे होतें. त्यानें पुष्कळ वर्षे राज्य केलें. त्याच्या कार- कीर्दीत दक्षिणी व परदेशी ह्या दोन पक्षांचे तंटे विकोपास जाऊन एकसारखे दंगेधोपे चालू राहिले, आणि त्यांतच राज्याचा अंत झाला. ह्यावेळी निजाम्-उल्मुल्क बहिरी हा दक्षिणी तटाचा पुढारी असून वजीर होता, आणि यूसुफ आदिलखान हा गवानच्या मागून परदेशी तटाचा पुढारी झाला होता. बहिरी हा मूळचा वाटलेला हिंदु होता, आणि यूसुफ हा तुर्क गुलाम

विजापुरचा सुमेदार होता. तिकडे त्यानें आपला अधिकार पुष्कळ वाढविला. त्यास त्या कामावरून दूर करण्याकरितां शहानें पुष्कळ प्रयत्न केले. निजामाच्या हातात शहा हा केवळ बाहुल्याप्रमाणें होता. त्याच्यानें दोन पक्षांतील तंव्यांचा बंदोवस्त झाला नाहीं. हे तंटे विकोपांस जाऊन राजधानींत बीस दिवस सारखा रक्तपात चालला होता. उभय पक्षांचे पुष्कळ लोक मेले. शहाच्या मनांत त्या दक्षिणी वजिराविषयीं वाकडे येऊन त्यास ठार मारण्याचा त्यानें प्रयत्न केला, तो सफळ झाला नाहीं. पुढे परदेशी लोकांचा कट जास्त बळकट होऊन त्यांनीं वजिरास ठार मारिलें. तेव्हां शहा निर्धास्त होऊन चैनबाजींत निमग्न झाला. तख्त-इ-फिरोज फोडून त्याचे त्यानें चहा पिण्याचे पेले केले. नंतर दक्षिणी व हवशी लोकांनीं शहास ठार मारण्याचा घाट घातला, वाच्यांत मोठा दंगा उसळला पण परदेशी लोकांच्या मदतीनें शहा वांचला. ह्यानंतर शहाच्या दुर्व्यसनाचा कळस झाला. मग लोकांनींही तोच कित्ता उचलिला. पाठशाळेतील शिक्षकही हातांत पेले घेऊन झिंगू लागले. तेव्हां शहाचा अधिकार कोणी जुमानीनासे झालें. ठिकठिकाणचे सुभेदार स्वतंत्र झाले, मयत निजाम-उल्मुल्क ह्याचा मुलगा मलीक अहंमद बहिरी ह्यानें अहंमदनगर नांवाचे शहर वसविलें. विजापुरचा सुभेदार यूसुफ आदिलखान व वऱ्हाडचा सुभेदार फत्तेउल्ला इमाद-उल्मुल्क यांस बहिरीनें आपआपल्या जागी स्वतंत्र होण्यास भर दिली; तेव्हां तेही लवकरच स्वतंत्र झाले, (सन १४९३१). त्याचप्रमाणें तैलंगणाचा सुलतान कुली ऊर्फ कुल्लू-उमुल्क हाही स्वतंत्र झाला. बेदरचा सुभेदार कासीम बेरीद हा शहास नामशेष करून स्वतंत्रतेनें सर्व कारभार करूं लागला. ह्या वेळेपासून म्हणजे सन १४९३ च्या सुमारास बहामनी राज्य समाप्त झाले, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

बहादूरखान नामक एक सरदार मिरज, पन्हाळा, कोल्हापुर, दाभोळ, चौल व इतर कोंकणांतील मुलूख बळकावून बसला होता. त्याजवर शहानें स्वारी करून त्यास ठार मारिलें, आणि त्या प्रांतीं दुसरा एक सरदार कायम केला. वरच्या स्वतंत्र सरदारांपैकी कित्येक सरदार मरण पावले, आणि त्यांचे अधिकार त्यांच्या मुलांस प्राप्त झाले. पुढे इ. सन १५१८ त हा दुर्दैवी महंमूदशहा मरण पावला. त्याचें सत्र आयुष्य हालअपेष्टेंत गेलें. त्यानें सदतीस वर्षे राज्य केलें.

अहंमदशहा, (सन १५१८-१५२०) मयत शहाचा मुलगा अहंमद ह्यास राजधानीच्या प्रांताचा सुभेदार अमीर बेरीद, कासीम बेरीचा मुलगा, ह्यानं तख्तावर बसवून राज्यकारभार चालविला, आणि शहाच्या निर्वाहास त्यानें थोडीशी नेमणूक करून दिली. अशा दैन्यावस्थेत दोन वर्षे घालवून सन १५२० त शहा मरण पावला. अला-उद्दीनशहा, (सन १५२०-२१)- पुढें अहंमदशहाचा भाऊ अला-उद्दीन गादीवर बसला, पण वजीर अहंमद बेरीद ह्यानें त्यास पदच्युत करून वली-उल्ला श्यास तख्तावर बसविलें, (सन १५२१-२४), शहाच्या राणीवर फिदा होऊन अमीर बेदीनें त्यास ठार मारिलें. ह्यानंतरचा शहा कलीम-उल्ला (सन १५२४-१५२६ ) हा आमरण अहंमदनगरच्या बुद्दाण निजामशहाकडे राहत होता.

**बहामनी राज्याचे समालोचन** –

प्रसिद्ध वजीर महंमद गवान मरण पावल्यावर बहामनी राज्य लवकरच मोडून त्याचीं पांच राज्ये झालीं, तीं येणेंप्रमाणें:-१ विजापुरचें आदिलशाही; २ गोवळकोंड्याचें कुतुबशाही; ३ वऱ्हाडची इमादशाही; ४अहंमदनगरचें निजामशाही; आणि ५ बिदरची बरीदशाही . बहामनी राज्य सन १३४७ पासून सन १५२६ पर्यंत सरासरी १७९ वर्षे चाललें. यादवांच्या मागून महाराष्ट्रांत प्रबळ राज्य असें हेंच झालें. विजयनगरचें हिंदु राज्य मात्र ह्याच्या तोडीचें होतें. शिवाय वरंगळ, ओढ्या, कोकणपट्टी, येथे लहान लहान हिंदु राज्यें होतीं, त्या सर्वांस जिंकून, बहामनी शहांनीं नर्मदेपासून तुंगभद्रे- पर्यंत आपला अंमल बसविला होता. गुजरात व माळवा ह्या देशांवर स्वतंत्र मुसलमान राजे राज्य करीत होते. त्या काळच्यां हिंदुस्थानांतील सर्व राज्यांत बहामनी राज्य बळकट असून, संपत्तीनें व ऐश्वर्यानें दिल्लीच्या तत्कालीन मुसलमानी बादशाहीच्या बरोबरीचे होतें. दिल्लीच्या शहास बहामनी राजांकडे वांकच्या नजरेनें पाहण्याची छाती नसे. या राज्याची व्यवस्था आरंभी चांगली होती. पण कालां- तरानें क्षुल्लक कारणांवरून परमुलखांवर स्वाऱ्या करून बहामनी राजे राज्यविस्तार करूं लागले; आणि जिंकिलेल्या प्रांतांची नीट व्यवस्था करण्याकडे त्यांनी फारसे लक्ष दिलें नाहीं. महंमद गवानच्या वेळेपर्यंत ह्या राजाच्या चार तर्फा किंवा चार सुभे होते. गवाननें एकंदर राज्याच्या आठ तर्फा केल्या. तर्फांवर नेमिलेले अधिकारी एक प्रकारचे स्वतंत्र राजेच असतात. दिवाणी, मुलकी, फौजदारी व लष्करी वगैरे सर्व अनियंत्रित अधिकार त्यांजकडे असतात. तर्फेदारांस जहागिरी नेमून दिलेल्या असत; रोकड वेतनें नसत. प्रत्येक तर्फदार

आपापल्या शक्तीप्रमाणें हुजूरच्या हुकुमाची अवज्ञा करूं लागला, असें करतां करतां त्याचे अधिकार हळुहळू वाढत गेले. जोंपर्यंत शहाचा कारभार जोरांत होता, तोंपर्यंत तर्फदारांचें कांहीं चाललें नाहीं. पण शहाचें वजन कमी पडतांच तर्फदारांस जोर आला. निजामशहा व महंमद- शहा अल्पवयी असल्यामुळे, त्यांच्याच वेळेस हैं राज्य मोडावयाचें, पण महंमद गवानच्या शहाणपणानें तें कांहीं दिवस टिकलें, गवानानें जी व्यवस्था केली तीमुळें तर्फदारांस स्वतंत्र अधिकार वापरतां येईनात; म्हणून ते सर्व ह्या व्यवस्थेच्या बिरुद्ध होते. ज्या सालीं बहामनी राज्याची समाप्ति झाली, त्याच सालीं बाबरानें मोगल राज्य हिंदुस्थानांत स्थापिलें, बाबराच्या वंशजांनीं ह्या बहामनी राज्याच्या शाखांचा शेवटीं अंत केला. राज्य स्थापन झाल्यापासून कांहीं दिवस तें सुरळीत चालून वृद्धिंगत व्हावयाचें, आणि वाढतां वाढतां शेवटीं त्याच्या स्वतंत्र शाखा बजून त्यांचाही पुढें लय व्हावयाचा, हा राज्यनियम मोगल बादशाही, मराठेशाही व जुनें चालुक्यांचे राज्य ह्या सर्वांस सारखाच लागू पडतो. बहामनी राज्याच्या नाशाचीं कारणें येणेप्रमाणें सांगतां येतीलः-

(१) सरदारांस वंशपरंपरा जहागिरी नेमून देणें; (२) सुभ्यांवर स्वतंत्र अधिकार देऊन कायमचे कामगार नेमणें; (३) नोकरांस व रयतेस सारखे लागू पडणारे कायदे व नियम केलेले नसणें; (४) कामदारांच्या नियमित पायऱ्या बांधून नियमानुसार सर्वांस वर चढण्यास सारखी सवड नसणे, दरबार ही मुत्सद्दी बनविण्याची एक शाळाच व्हावी, अशी व्यवस्था ह्या राज्यांत केलेली नव्हती.

बहामनी शहा प्रजेस सुख देत, आणि जरी हिंदूंस मुद्दाम त्रास देत नसत, तरी हिंदूंस दरबारांत मोठमोठे अधिकार मिळत नसत. एवढया इतिहासांत वर लिहि- लेल्या हकीकतींत हिंदु अंमलदारांचीं नांवें फार थोडीं आहेत. फौजेंत हिंदूस जागा थोड्याच मिळत, आणि मुसलमानांचे वर्चस्व हिंदूवर असे. हिंदू लोक हलक्या नोकऱ्या व शेतीभाती करून निर्वाह करीत. बहामनी राज्यांत इतकीं बंडे झालीं, इतक्या लढाया झाल्या, व इतक्या राज्यक्रांत्या झाल्या, पण कोणत्याही खटपटीत हिंदु लोक अग्रेसर असल्याचे आढळत नाहीं. त्यांनी बंडे केलीं नाहींत; आणि सामान्यतः दुष्ट कृत्यास साह्य केलें नाहीं. जरी बहामनी राज्यांत हिंदूचीच मुख्यतः वस्ती होती, हवशी, तुर्की, इराणी, मोगल वगैरे परदेशीय लोक इकडे येत आणि त्यांसच राजाश्रय व इनामें मिळत. मुसलमान घराणीं वाढत गेल्यानं आणि त्यांस राजाश्रय असल्यानें हिंदूंचे महत्त्व कमी कमी होत गेलें. विजयनगरचें राज्य शेजारी नसतें तर हिंदूंचा निःपात ह्याहूनही जबरदस्त झाला असता.

बहामनी राज्याच्या वेळेस परदेशाशीं हिंदुस्थानचा व्यापार व दळणवळण वाढत गेलें. व्यापार बहुतेक कारवानांच्या हातीं होता, व्यापारी लोक युरोपांतील आणि उत्तर व पश्चिम-आशियांतील हरएक माल दक्षिणेंत आणीत. नृत्यगायनादि राजा- श्रयानें वाढणाऱ्या कला भरभराटींत होत्या. त्या वेळच्या हकीकतींवरून असें कळतें की रस्त्यावर चोरांचे भय नसून प्रवास करणारांस उपद्रव होत नसे. बहामनी राजे तोफांचा उपयोग करीत असत. त्या राजांनीं बांधिलेल्या कित्येक इमारती पाहण्या- लायक आहेत. कलबुर्गा व बेदर हीं त्यांचीं राजधानीचीं शहरें होतीं. बेदरची पाठ- शाळा वर्णनीय होती. राज्यांत सर्व लोकांस शिक्षण मिळण्याच्या जरी सोयी नव्हत्या तरी मुसलमान लोकांस शिक्षण देण्याची व्यवस्था प्रत्येक खेड्यांत केलेली होती. फारशी व आरबी ह्या भाषा विनखर्चानें शिकतां येत असत. राज्यांत मुसलमान जातीच्या विद्वान् लेखकांस व कवींस राजाश्रय चांगला मिळे.

हिंदु लोकांची ग्रामसंस्था ह्या राज्यांत दिवसेंदिवस दृढ होत चालली होती. अथेनेसियस नितिकिन 'ह्या नांवाचा रशियांतील आर्मिनिया प्रांतांतला एक न्यापारी सन १४७० त बेदर शहरास आला होता. त्यानें तेथली कांहीं हकीकत लिहून ठेविली आहे. दर दोन मैलांच्या अंतरानें हल्लींच्या प्रमाणेंच त्या वेळेस गांवें वसलेलीं असत. रस्त्यांवर चांगला बंदोबस्त असून प्रवास करणारांस भीति नसे. बेदरची हवा फार चांगली असून तें शहर सुरेख होतें. बहामनी राजांनीं बांधिलेले किल्ले हेच त्यांचें चिरकाल राहणारें स्मारक होतें. त्यांनीं सपाटीवरचे व डोंगरी वगैरे सर्व प्रकारचे मजबूद किल्ले बांधिले. त्यांपैकीं गाविलगड व नरनाळा, हे मजवुदीची साक्ष आजमितीस देत आहेत. मोठमोठ्या गांवांतून मशिदी असून त्यांस सरकारांतून नेमणुका करून दिलेल्या असत. प्रत्येक मशिदींत एक मुल्ला नेमिलेला असून तोच शाळाशिक्षकाचेही काम पाही. मोठमोठ्या शहरांतून पाठशाळा असून त्यांस मोठाल्या नेमणुका करून दिलेल्या असत. तैलंगण प्रांतांत बहामनी राजांनी बांधिलेले पुष्कळ तलाव इत्यादी शाबूद आहेत.